नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

अनुक्रमणिका

युगवाणी



कै. हरि नारा

मृत्यु– २२ नोव्हेंबर

वर्ष ९ : अंक ९
डिसेंबर १९५४
किंमत आठ आणे

अनुक्रमणिका

मध्यप्रदेश शाळाखात्याकडून लायब्ऱ्यांसाठी मंजुरी मिळालेलें

युगवाणी

संपादक

पु. य. देशपांडे

संपादक-मंडळ

कुसुमावती देशपांडे
पां. ब. गाडगीळ
गो. रा. दोडके
ग. त्र्यं. माडखोलकर
के. ज. पुरोहित
ना. रा. शेंडे

या अंकांत

संपादकीय

कै. हरिभाऊ नेने

विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष, हरिभाऊ नेने यांचें सोमवार दि. २२ नोव्हेंबर ५४ रोजीं सकाळीं ४ वाजताचे सुमारास देहावसान झालें हें कळवि-ण्यास आम्हांस अत्यंत दुःख होत आहे. हरिभाऊ थोडे आजारी होते हें खरें; पण त्यांची प्रकृति अस्वस्थ झाली आहे असें कोणासहि वाटलें नव्हतें. आदल्याच दिवशीं म्हणजे रविवार दि. २१ नोव्हें-बर रोजीं, सकाळीं ८॥ वाजतां संघाच्या एका उपसमितीची सभा त्यांच्या घरीं भरली होती. त्या सभेचें संचालन हरिभाऊंनीं बिछान्यावर बसू-नच जरी केलें तरी अवघ्या चोवीस तासानंतर हरिभाऊ सर्व दृश्य संचालनाच्या पलीकडे निघून जातील अशी कल्पना कोणाच्याहि मनाला शिवली नाही.

उत्तम शिक्षक व शिक्षणतज्ज्ञ, महानुभाव वाङ्मयाचे विख्यात संशोधक आणि निरलस समाज-सेवक या नात्यांनीं हरिभाऊंनी केलेलें कार्य थोर दर्जाचें होतें. पण आपल्या जीवनाचीं शेवटचीं तीन-चार वर्षे हरिभाऊंनी विदर्भ साहित्य संघालाच जणू सर्वस्वी समर्पित केलीं होतीं. संघाचें कार्य नांवारूपास यावें व वि. सा. संघ ही एक आदर्श साहित्यिक व सांस्कृतिक संस्था व्हावी यासाठी हरिभाऊंनीं आपल्या उतारवयांत देखील जी प्रचंड अंगमेहनत घेतली ती तरुणांनाहि लाजविणारी होती. संघकार्यासाठी हरिभाऊंनी रोज पांच-दहा मैलांची पायपिटी करावी, तासन्तास कार्यालयांत बसून संघाच्या अनेक उपसमित्यांचें काम करावें, सालोसाल येणाऱ्या व अलीकडे अधिकाधिक संघर्ष-मय होऊं लागलेल्या निवडणुकांचें काम चोख व्हावें ह्यासाठीं श्री. ना. रा. शेंडे यांच्या सहकार्याने कार्या-लयांत कधीं-कधीं रात्रीं एक दोन वाजेपर्यंत कारकुनी करीत बसावें आणि कामाचा एवढा डोंगर रोज आपल्या खांद्यावर घेऊन वावरत असतां चेहऱ्यां-वरचें हास्य कधींहि मावळूं न देतां उलट त्यास सौजन्य, मनमिळाऊपणा, समतोलता व कुणालाहि न बोचणारा विनोद इत्यादि दुर्मिळ गुणांच्या सुंदर किनारीची जोड द्यावी, हें सर्व गेलीं तीन-चार वर्षे ज्यांना रोज पाहावयास मिळत होतें त्यांना हरिभाऊंच्या आकस्मिक निधनाची वार्ता ऐकून काय वाटलें असेल, हें कल्पनेवरच सोपविलेलें बरें.

सरचिटणीस, संपादक 'युगवाणी' आणि चालू सालचें अध्यक्ष इत्यादि नात्यांनीं हरिभाऊंनी वि. सा. संघाची सेवानिवृत्त अवस्थेंतहि जी सेवा केली तिला तोल नाहीं व मोलहि नाहीं. सार्वजनिक संस्था कशी चालवावी याचा एक आदर्शच हरि-भाऊंनीं घालून दिला. गेल्या चार-पांच वर्षांत संघकार्याला केवळ प्रादेशिकच नव्हे, तर थोडयाशाच प्रमाणांत कां होईना, राष्ट्रीय महत्त्व प्राप्त करून देण्यांत ज्यांचे अविरत श्रम कारणीभूत झाले त्यांच्यापैकी हरिभाऊ अग्रगण्य होते. त्यामुळेच

अनुक्रमणिका

वि. सा. संघाच्या भव्य इमारतीचा उद्घाटन समारंभ हरिभाऊंच्याच अध्यक्षीय कारकीर्दीत राष्ट्रपति डॉ. राजेंद्रप्रसाद यांच्या हस्तें थाटानें पार पडूं शकला. हरिभाऊंच्या थोर सेवेला हीं जी अनन्य-साधारण मान्यता मिळाली तोच त्यांच्या बाह्य जीवन सार्थकतेचा कळस ठरला. सामाजिक दृष्टया हें यथायोग्य असेंच झालें असलें तरी संघदृष्टया अध्यक्षीय कारकीर्दीचा कळस म्हणजे वर्षाअखेर संमेलनाचें अध्यक्षपद भूषविणें हाच मानण्यांत येत असल्यामुळे यंदाचें संमेलन पार पडण्याच्या आंतच हरिभाऊंचें देहावसान घडून यावें, ही घटना सर्व सहृदय संघसदस्यांच्या काळजास घरें पाडल्याशिवाय राहणार नाहीं.

हरिभाऊंच्या कुटुंबियांवर तर दुःखाचा डोंगरच कोसळला आहे. विदर्भ साहित्य संघाचे सर्व सभासद आणि सहकारी संस्था, भिडे कन्या शाळा, राजाराम वाचनालय आणि अनेक व्यायाम संस्था व हरिभाऊंचे प्रांतभर पसरलेले असंख्य विद्यार्थी हे सर्व त्यांच्या दुःखांत समभागी आहेत हें लक्षांत घेऊन त्यांचे दुःख थोडें तरी हलकें होईल, अशी आम्हीं आशा करतों.

विदर्भ साहित्य संघ आणि 'युगवाणी' हरिभाऊंच्या पुण्य–स्मृतीस ही अखेरची श्रद्धांजलि वाहत आहे.



" कै. हरिभाऊ नेने यांचे अंत्यदर्शन "

अनुक्रमणिका



" कै. हरिभाऊ नेने यांचें अंत्यदर्शन "

शोक आणि क्षमा

विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष श्री. ह. ना. नेने यांच्या आकस्मिक निधनामुळे 'युगवाणी'चा हा अंक लहान काढावा लागत आहे, याबद्दल वाचकांची व संघाच्या सभासदांची क्षमा मागतो. पुढील अंक "कै. ह. ना. नेने विशेषांक" म्हणून प्रसिद्ध होईल. कै. हरिभाऊंच्या स्नेह्यांनी व शिष्यांनी त्यांच्या संबंधीच्या आठवणी पाठवाव्या, अशी जाहीर विनंती करीत आहो. मुखपृष्ठावरील छायाचित्र अखिल भारतीय नभोवाणी केंद्र, नागपूर, श्री. कांत द्वारा प्राप्त झाले.

— संपादक

खुलासा

दिवाळी अंकांतील श्रीमती इंदुमती शेवडे यांच्या मानव आणि काळाची कल्पना— कलावंताच्या दृष्टिकोनांतून '— या लेखाच्या खाली 'नागपूर नभोवाणीच्या सौजन्याने' असा मजकूर नजरचुकीनें देण्याचा राहून गेला, याबद्दल आम्ही दिलगीर आहोंत.

— संपादक

युगवाणी वर्ष ९ वें डिसेंबर १९५४ अंक ९ वा

विदर्भ–वीणा

कै. कविवर्य भास्करराव तांबे यांच्या,
स्मृतीस
– समर्पण.

डोळेझांक

म. म. देशपांडे

यातनेचें काळे मुख
येतां जरा दृष्टीपुढें
डोळेझांक करीत मी
निघूनिया जातो पुढें !

माझ्यांतील मानवाचें
पुरलें मी कलेवर–
–खणूनिया मन खोल
लोटलेली माती वर!

जग विचारानें डोकें
व्हावयाला नको जड
बोलायाला नको कांही
भावनेनें अवघड !

डोळेझांक करीत मी
रस्त्यांतून जातो असा
मला नाही दिशा कांही
मला नाही भंरवसा!

पुरलेल्या मानवाची
मनांतच होते माती
जगण्याची इच्छा नाहि
राहिलेली नाही हातीं !

♣

अंधार :

वसंत निनावे

तूं आलिस राणी, अखेर शतशतकांनीं
स्वप्नांचे माझ्या रंग लेवुनी नयनीं
ओठांवर होतें गूज गूढ· धडधडतें
हळु शुभ्र स्पर्श अभ्रांचा गात्रांमधुनी

तूं आलिस, होंता भवति परी अंधार
सोडीत काजळी अंध धुंद फूत्कार
–कळलेंही नाही, नाहि पाहिलें तुजला
मी निजलों घेउन उशास विरह–विखार !

सरतांच रात्र अन् पहाट अलगद आली
पायवाट पुढची आळस देउन उठली
अंगणांत पिवळें चिव हासला निंब
पापणींत माझ्या नजर सुनी भिरभिरली

भूमीवर होतें अलकपुष्प तव गळलें
शय्येचें होतें वस्त्र जरा विसकटलें
पण फक्त तेवढें : नव्हतिस तूं कोठेही
–तिमिरास पुन्हा भर दिवसा भरतें आलें !

♣

इषारा

मधु वाबगांवकर

एवढ्यांतसें नको धोटपण
इतुकें अवखळ निलाजरेंहि
जरा जपुन घे !
जरा जपुन घे —.
सराईतसा चटावलेला चटोर वारा
नेइल लुटुनी कणकण वेंचुन सौरभ सारा
घेइल शोषुन रसमय जीवित.
उरशिल अंतीं विकसनविन्मुख
गंधहीन अन् नीरस केवळ
अजुन उमलली होती नव्हती
हुंगियलेली अशी अनामिक इवली कलिका !
पाकळींतलें नाही फुललें
मार्दव अवघें
तोंच नको ही अशी उतावीळ अवखळ उठवळ
अजाण हिरवो कोंवळीकहि थिजेल पुरती
विरतिल आणिक
अर्धोन्मीलित अपुरे सुस्वर !
नुरेल कांही !!

♣

गारवा

प्रभाकर चांदेकर

थंड वादळी हवा—
भुरभुरणारा पाउस गार

गवताच्या हिरव्या पात्यांवर
रोमांच उभे !

रोमांच उभे कौलारावर
चिमणीच्या इवल्या, भिजल्या—
हुडहुडत्या पंखांवर
आणि उभे अंगावर माझ्या
तुझ्या स्मृतींचे
हिरव्या हळव्या हुरहुरीचे.

♣

हिवाळ्यांतली

प्र. न. हवालदार

धुंदकारल्या कुंद कळ्या अन्
शहारल्या पाकळ्या गुलाबी
थरारली पर्णांची काया
मोहरलें कांपरे मुकेपण

किण किण पैंजण लेवून आली
हिवाळ्यांतली पहिली थंडी

पहांटच्या गुल्‌जार दंवांत
चिंब जाहली जमीन काळी
कंपित अंगावर धरणीच्या
वस्त्र धुक्याचे पिंगट धूसर

लाजत, ठुमकत, मुरडत आली
हिवाळ्यांतली पहिली थंडी

आकाशांतील निळीं चकाकी
गार थंडीनें मनीं हळहळे
नवलाईच्या पहिल्या थंडींत
रोप पोपटी उभे गव्हाचे

अंगा बिलगत झोंबत आली
हिवाळ्यांतली पहिली थंडी

सांजकाळचा शीतल वारा
चुंबित सुटला फांद्या पानें
तरुवल्लीच्या कायेवरती
नवतीचे रोमांच उभे

नव्या कल्पना, नव्या भावना उधळीत आली
हिवाळ्यांतली पहिली थंडी

♣

माझें झाकितो मी व्यंग

वसंत वऱ्हाडपांडे

आता वल्कलें नेसून माझे झाकितो मी व्यंग
आता सदा कष्टतों मी झाकायाला मूळ रंग !

एक नजरेचा तीर सात पांखरें पाडावीं
भल्याभल्यांच्या देखत पिसें तयांचीं खुडावीं

आणि गर्वात सांगावी अशा पौरुषाची गाथा
मनीं हासावें झुकता सज्जनांचा ऊंच माथा!

--असे घडे न परंतु येता प्रत्यक्ष प्रसंग
मनीं येतो विचारहि; पण कांपतसें अंग

संभाविताचा बुरखा आणि ओढूनिया घेतो
चोर असूनहि आव नित्य सावाचा आणतों !

तीक्ष्ण घेऊनी खंजीर वार जिव्हारीं करावा
करूनीया हालहाल घोट नरडीचा घ्यावा

आणि आपुल्या शत्रूचा पुरा होताच निःपात
क्रूर विकट हासावे मान जाताच फासांत !

--असे घडे न परंतु ! --धैर्य पेलावयासाठी
हवी योजन विशाल अशी पोलादाची छाती !

दिसूं नये ही उणीव हाच एक मला ध्यास
मतपरिवर्तनांत माझा म्हणूनि विश्वास !

कधी पाडावा दरोडा : धन लुटूनी आणावें
शब्दकोडयांत निदान एक लाख प्राप्त व्हावे

आणि टोलेजंग शिल्प एका बांधावे रात्रींत
तळमजला पाताळीं शिरमजला स्वर्गांत !

--नामजप एकमात्र सदा मुंबई न्यूयॉर्क
शिणताच घ्यावा जरा फ्रान्सदेशाचा द्राक्षार्क

जादू पिवळी करून आणि एखाद्या पक्षाचे
व्हावे मुखंड फेकाया शब्द पोकळ त्यागाचे...

--असे घडे न परंतु, दिसे डोळयास न धन
'सब भूमि गोपाल की' माझें आता तत्वज्ञान!

गळा तुळशीची माळ हातीं टाळ नि मृदंग
आहे शुभ्र बाराबंदी झाकावया माझें अंग

ओठावर रामनाम! 'आचरणीं शुद्ध' – कीर्ति
आहे संख्या रात्रंदिन माझ्या शिष्यांची वाढती

--पण माझ्या शिष्यांमध्यें संख्या पुरुषांची कमी
उत्सुक मी माउलींना मंत्र द्यायला नेहमी !

रंग चढता कीर्तनीं! म्हणे लक्ष्मण, 'जाणतो
फक्त नूपुरें सीतेचीं, अन्य दागिने नेणतो"

मात्र डोळे न्याहाळती कोण सोळावीसामध्यें
किती प्रसाद जाहला गोळा रामचंद्रापुढे !

परी वल्कलें नेसून माझें झाकितों मी व्यंग!
आणि सदा कष्टतों मी झाकायाला मूळ रंग !

♣

अनुक्रमणिका

एक रुप्याचें पांखरूं

रमेश वाबगांवकर

भव्य गूढ मशिदीच्या
निळ्या काळ्या घुमटांत
शुष्क काजळी ढगांचीं
कोळिष्टकें लोंबतात.

कधीचीच विरलेली
खिन्न बांग नीरवांत
उदासता भरलेली
अंतरांत कांठोकांठ...

...एक रुप्याचें पांखरूं
दूर क्षितिज-दारांत
पंख तेजाचे खोलून
येई हलकेंच आंत.

--आणि पांखरूं रुप्याचें
निळ्या निळ्या घुमटांत
उडे एकाच रेषेंत
वेध अज्ञाताचा घेत !

♣

जलचक्रांतिल झाले नौका

गणेश पाठक

सोनेरीं सुखस्वप्नें विरलीं
तरळत अस्फुट कांही स्मरणीं
पळघटिकेला नित्य जागवी
वास्तवतेची तीक्ष्ण पराणी

मंदानिल लहरिंच्या हातें
धूसर वारुनि तरल ओढणी
आसमंत घे नवी चेतना
रवितेजाच्या दिव्य नोहनीं

उन्हें कोवळीं कणाकणाने
वाढूं लागलीं पाय पोळले
अग्निदिव्य अन् दाहक सहुनी
नर्म हृदय मम पुरतें उललें

बालपणीचें निर्मल मार्दव
सोडूं लागले उष्ण उसासे
लोपुनि गेली नयन-रम्यता
उरली राखड कांही कोळसे

नको तयांच्या लागुनि नादी
अपेक्षितांना दिधला धोका
शीड सुकाणूं विरहित आता
जलचक्रांतिल झालें नौका !

♣

अनुक्रमणिका

मातीची आकांक्षा

बाबा मोहोड

युगायुगाची निजलेली मी माती
कुजलें जीवन माझें
रुजलीं बीजें माझ्या कुशींत
गंध साठले पोटीं
युग–पुष्पांच्या पाकळया अनंत
पेंगळल्या अंकावर माझ्या
स्थिर, शाश्वत शांतींत
अन् रक्षणांत त्या निद्रित सर्वांच्या
मीहि निजलें, मीहि कुजलें
थिजली माझी प्रीति
युगायुगाची निजलेली मी माती !

बिजलीनें मज दिधला उजळा
वर्षेनें मज केलें चिंब
ताप दिला ग्रीष्मानें
प्रीतीहि मिळाली मला वसंताकडून
रंग मिळाला, गंध मिळाला
भक्ति, प्रीति, श्रद्धा
सगळेंच मिळालें मजला
नाहींच हासल्या तरीहि माझ्या राती
युगायुगाची निजलेली मी माती !

न्हालें मी चंद्राच्या किरणीं
ऐकलीहि टिटवींचीं गाणीं
थारोळयांत रक्ताच्या भिजलें
शस्त्रास्त्रांचे ऐकिले खणखणाट निजल्यानिजल्या
तरीहि माझी अचल राहिली निद्रा
दूर राहिली भीति
युगायुगाची निजलेली मी माती !

पण आज निराळे खग-रव पडले कानीं
झोप उडाली युगायुगाची
जोम नवा कणकणांत शिरला
तेज नवें, उत्साह नवा, नवी शिरशिरी
संचरली अंगांत
उचंबळली आकांक्षा बिजलीच्या वेगानें
आणि उजळल्या काळ्या राती
युगायुगाची निजलेली मी माती !

भूक–बळींच्या मूक वेदना
आज मिसळल्या माझ्या कणांत
पेटलें जीवन
धग असह्य झाली माझी मलाच
मारावीं मिठी तापत्या सूर्यास
उद्धरावे, पेटवावे क्षुधितांते
याविण ना आकांक्षा
नाहींच कशाची क्षिति
राहीन सदा गरगरती
धगधगती
युगायुगाची निजलेली मी माती !

♣

या देव्हाऱ्यांत

विनायक पाठक

प्राजक्ताचा सडा रोज
पडे माझ्या परिसांत
चांदण्याची रास जणूं
कुणी रोज उधळत !

वेंचायास जावयाचा
टाळते मी सदा मोह
पडतील माझे आंसू
सौंदर्याला देत दाह !

कुणासाठी वेंचू फुलें ?
प्रारब्धाचें संपूजन
रिकाम्या या देव्हाऱ्यांत
रेंगाळत माझें मन !

♣

अनुक्रमणिका

तांब्यांचें मार्गदर्शन

★ लेखक भवानीशंकर श्री. पंडित ★

राजकवि तांब्यांचें देहावसान होऊन तेरा वर्षें लोटलीं, परंतु त्यांच्या सहवासांत जे अनंत क्षण व्यतीत झाले त्यांचा मधुर सुवास माझ्या स्मृतिसंपुटांत चिरकाल दरवळत आहे. माझ्यापेक्षा कांहीं वर्षांनी वडील असे माझे परम मित्र श्री. लक्ष्मण वामन वैद्य यांच्या मध्यस्थीने सुमारें चौतिस वर्षांपूर्वी मी अगदीं पोरवयाचा असतांना तांब्यांशीं माझा निकट संबंध आला. त्यावेळीं तांबे अजमेरास ग्वाल्हेर राज्यांतील संस्थानिकांच्या कुमारांचे 'गार्डियन' होते. वैद्यांना मेयो कॉलेजांत खासगी शिकवण्या होत्या. कॉलेजजवळच तांब्यांचा 'निवास' होता. त्यामुळे त्या दोघांच्या नित्य भेटीगांठी पडत व गप्पासप्पा झडत. या त्यांच्या 'काव्य-शास्त्रविनोदां'त पुढे लवकरच मी आणि माझे इतर मित्र वांटेकरी झालों.

१९२१ च्या दिवाळींत अजमेरच्या नूतन महाराष्ट्र समाजाचा वार्षिकोत्सव होता. तींत वैद्य प्रभृति आम्हीं मित्रांनीं भाग घेतला होता. तांबे परीक्षक होते. त्यांचा निकाल आमच्यापैकीं कुणालाहि अनुकूल नव्हता. आमच्यापेक्षा वयस्क विदुषी प. वा. चिमाताई कजवाडकर यांच्या भाविक कविता तांब्यांना अतिशय आवडल्या. अर्थात् पारितोषिक त्यांना मिळालें. चिमाताईंची कविता मला अजून आठवते. प्राचीन कवींप्रमाणे तिच्यांत परमेश्वरावर मानवी विकारांचा आरोप केला होता.

नूतन समाजाच्या या उत्सवप्रसंगामुळे माझा तांब्यांशीं प्रत्यक्ष परिचय होण्याचा योग आला. गुणान्वयें माझा क्रम दुसरा होता. माझ्या एका कवितेचा आरंभ 'दयाला! लाव तारूं हें पार' असा होता. तांब्यांना हें पालुपद आवडलें होतें. त्यांनी वैद्यांपाशीं माझ्याविषयीं विचारपूस केली; व एक दिवस सवड सापडतांच गव्हर्मेंट हायस्कूलमधून परभारें मी वैद्यांवरोबर तांब्यांचा 'निवास' गाठला. तांब्यांनीं आपल्या स्नेहशील वृत्तीनें आमचें स्वागत केलें. मीं त्यांना विचकत विचकत माझ्या कविता म्हणून दाखवल्या. तांबे पदोपदीं उत्तेजन देत गेले. त्यांच्या अजमेरच्या वास्तव्यांत एखाद-दुसरा दिवसच असा सुना गेला असेल, कीं जेव्हां आम्हीं त्यांच्याकडे गेलों नसूं वा ते आमच्याकडे दक्षिणी वाड्यांत आले नसतील.

तांब्यांच्या व आम्हां मित्रांच्या वयांत जवळ जवळ तीन तपांचें अंतर होतें. पण ते आमच्याशीं आपलेपणाने वागत व काव्यशास्त्रविषयक माहिती मोकळेपणाने सांगत. त्यांच्याकडे पोचण्याचाच अवकाश, संभाषणाच्या ओघांत ते स्वतःच्या अथवा आपल्या आवडत्या कवींच्या काव्याचें वाचन करीत व रसचर्चा करीत. या अपूर्व आनंदांत घटकांमागे घटका कशा निघून जात याचें त्यांच्याप्रमाणे आम्हांलाहि भान राहात नसे. ते दिवस गेले, पण त्यांचें सुखकर स्मरण अजून ताजें आहे.

तांबे बहुभाषी होते. यामुळें त्यांच्या बोलण्यांत संस्कृत, हिन्दी, फारसी, उर्दू, आणि इंग्रजी या वाङ्मयातील कवींच्या काव्यांचें विवेचन होत असे. इंग्रजीवर त्यांचें असाधारण प्रभुत्व होतें. यामुळे एखाद्या कवितेवर ते स्पष्टीकरणात्मक भाष्य करूं लागले म्हणजे बहुधा तें इंग्रजींत होत असे. त्यांच्या काव्यवाचनास रसानुकूल उच्चारांची आणि भावानुकूल अभिनयाची जोड असल्यामुळें तें अत्यंत परिणामकारक होत असे. तांबे केवळ साक्षात्कारी भावकवीच नव्हते; ते रसज्ञ व मर्मज्ञ मार्गदर्शक होते. त्यांची रसचर्चा व टीका मम्मट, दंडी, आनंदवर्धन, जगन्नाथ प्रभृति पौरस्त्य साहित्यशास्त्रकारांच्या ग्रंथांच्या अध्ययनाने आणि डाउडन्, हॅमिल्टन्, ब्रॅडले, आर्नोल्ड प्रभृति पाश्चात्य टीकाकारांच्या वाङ्मयाच्या परिशीलनाने संपन्न झालेली होती. काव्याइतकेंच त्यांचें काव्यालोचन रसपूर्ण असे.

स्वतःच्या 'नववधू प्रिया, मी' या कवितेचें तुकारामाच्या 'कन्या सासुर्‍यासी जाये, मागे परतोनी पाहे' या अभंगाच्या आधाराने ते विवेचन करीत. ते म्हणत, "नववधू आपल्या प्रियकराच्या फोटोस हारतुरे घालते व छायेवर संतोष मानते, त्याप्रमाणे जीवात्मा हा पर-

मात्म्याच्या प्रतिमापूजनाने स्वतःचें समाधान करून घेत असतो." शेलेच्या

Our sincerest laughter
With some pain is fraught

या चरणांचें विवरण करतांना ते आपली 'घट भरा शिगोशिग' हीं कविता म्हणत असत. ते म्हणत, "पुत्रजन्माचा आनंद खरा, पण आईला प्रसवाच्या वेदना सोसाव्या लागतात. विवाहाचा उत्सव खरा, पण नवऱ्या मुलीला आपले आईबाप सोडावे लागतात." भगवद्गीतेंतील 'अव्यक्तादीनि भूतानि व्यक्तमध्यानि भारत' या सर्वश्रुत श्लोकाला समोर ठेवून ते केशवसुतांच्या 'कोणीकडुन ग कोणीकडे' या कवितेवर भाष्य करीत. ते म्हणत, 'भूत भविष्य अज्ञात आहेत. वर्तमान काय तो किंचित् ज्ञात आहे. म्हणजेच आपण तिमिरांतून येतों व तिमिरांत जातों. मध्ये थोडेसें ऊन पडतें तेवढेंच काय तें!"

शेक्सपिअर, मिल्टन, वर्डस्वर्थ, टेनिसन् प्रभृतींचीं 'सॉनेटस्' तांबे एका विशिष्ट पद्धतीने वाचीत असत. स्वतःचें 'लोचन हे' हें 'सॉनेट' म्हणतांना देखील 'कैशी मीं लपवूं, कुठे छिपवुं हीं' या चरणापासून ते गोंधळल्याप्रमाणे आवाज काढीत आणि 'आशा वृथा मन्मनीं!' या ठिकाणीं निराशेने एक लांब सुस्कारा सोडीत. 'आता दीनदयाघना' अित्यादि शेवटचे दोन चरण म्हणतांना त्यांच्या आवाजांत कारुण्याचा कंप उत्पन्न होई आणि डोळ्यांस पाणी येई. कविवर्य टागोरांची गार्डनरमधील "O Mother, the young prince is to pass by our door." ही कविता वाचतांना I swept aside the veil from my face, I tore the ruby-chain from my neck and flung it in his path या ठिकाणीं ते छातीवर हृदयाच्यापाशी लचका तोडल्याप्रमाणे उजवा पंजा आवळून धरीत आणि झटक्यांत तो तोंडापुढे उघडून कांहीतरी दूर फेकून दिल्याप्रमाणे आविर्भाव करीत. चारुदत्ताच्या तोंडच्या 'धन्यानि तेषां खलु जीवितानि' या मृच्छकटिकांतील श्लोकाचें खरें स्वारस्य व रहस्य स्पष्ट व्हावें म्हणून 'गात्राणि गात्रेषु परिष्वजन्ति' हा चतुर्थ चरण म्हणतांना ते अशा कांही खुबीने दोन्ही पंजे एकमेकांत अडकवीत, कीं त्यांतील अर्थ कळण्याची पंचाअीत पडत नसे. त्यांच्या त्या कृतींत चारुदत्त आणि वसंतसेना यांच्या 'ओलेत्या आलिंगना'चें आकर्षक दृश्य मनःश्चक्षूंपुढे अुभें राहात असे.

तांब्यांच्या व्यक्तिमत्वाचा, कवितेचा व तद्विषयक चर्चेचा माझ्या बालमनावर कायमचा प्रभाव पडला. तांब्यांना अुद्देशून मी अेक कविता रचली व ती त्यांना वाचून दाखविली——

वीणेच्या तव एक एक करितां
 झंकार तारा, मना—
होई तोष, डुले मुदें शिर, मिळे
 स्फूर्ती मदीयानना
त्याच्यातूनच साधिभोळि पडली
 बाहेर 'ही' लाजरी
आहे नूतन भोवताल म्हणुनी
 ऐशीं दिसे बावरी.
सध्या जैशी असे तशी
 देतों मी तुमच्या करीं
लाया द्या की धरा माथां
 योग्यता 'समजा' खरी!

ही कविता अैकतांच तांबे उद्गारले, "छे! तुमची कविता बावळी नाहीं. मात्र त्या 'समजा' बद्दल 'समजे' करा म्हणजे ती नम्र वाटेल." तांब्यांनी मला ही कविता तीनतीनदा म्हणावयास लावली. आणि मीहि ती तिप्पट उत्साहाने पुनःपुन्हा म्हणून दाखविली.

कवीच्या नम्रत्वावर तांब्यांचा विशेष कटाक्ष असे. ते म्हणत असत, "आम्ही देवाचे लाडके आहों असा किंवा अशा तऱ्हेचा दर्प कवीला कशाला हवा? अशानं तो स्वतःस हास्यास्पद करून घेतो." या विधानास समर्पक म्हणून ते कालिदासाचे 'मंदः कवियशःप्रार्थी गमिष्याम्युपहास्यताम्' इत्यादि श्लोक, तुकारामाचे 'साळुंकी ते कैशी, बोले मंजुळ वाणी, शिकविता धणी, वेगळाची' हे उद्गार म्हणत. स्वतः तांब्यांच्या—कुस्करूं नका हीं सुमनें, कळ्याकळ्यांत विहार, आलें तुझ्या रे! दारीं नृपा, अनंतस्तोत्र, क्षण सुवर्णकण झाले रमणा! इत्यादि गीतांत शालीनतेची भावना व्यक्त झाली आहे.

तांबे गहन व चमत्कृतिजन्य काव्यांपेक्षा साध्या पण उत्कट काव्यांस विशेष महत्व देत. उत्कटतेचें उदाहरण म्हणून ते बहुधा वाल्मीकीचा 'मा निषाद प्रतिष्ठां

त्वमगमः शाश्वतीः समाः । यत्क्रौंचमिथुनादेकमवधीः काममोहितं ।।' हा अंतःकरणाची खळबळ प्रकट करणारा सर्वप्रसिद्ध श्लोक म्हणत किंवा टेनिसनच्या

Come not, when
I am dead,
To drap the foolish tears
upon my grave,
To trample round
my fallen head,
And vex the unhappy dust
thou wouldst not save
There let the wind sweep
and the plover cry,
-But thou, go by.

या संतापजनक ओळी म्हणून दाखवत. ते म्हणत, "प्रसंग अंतःकरणाला झोंबण्यासारखा असला म्हणजे काव्य आपोआप निर्माण होतं. आनंद उपभोगत असणाऱ्या क्रौंचमियुनापैकी एकाला–बहुतकरून नराला– निषादानं आपल्या अमोघ बाणानं खाली पाडलं तों मादी आर्त आवाजानं ओरडूं लागली. येवढ्या एका प्रसंगानं आदिकवीचं चित्त कळवळलं व त्याच्या वाणींतून खरंखुरं उत्कट काव्य बाहेर पडलं."

'कवीला विद्वत्तेचें वावडें असतें का ?' याविषयी एकदा वाद निघाला असतांना तांब्यांनी विद्वत्तेच्या वतीनें मत दिलें. ते म्हणाले, "कवीवर विद्येचे आणि वेगवेगळ्या कलांचे संस्कार होणं अत्यंत आवश्यक आहे. मात्र त्यानं आपल्या जातिवंत प्रतिभेवर विद्वत्तेची कुरवोडी होऊं देऊं नये म्हणजे झालं. मोरोपंतांचं चुकलं तें इथंच." मोरोपंतांच्या स्वभावसिद्ध काव्यशक्तीविषयी बोलतांना ते म्हणत, "बारामतीचा मोरोपंत चोळीमहेश्वरावरून काशीप्रयागला गेला. दक्षिणेंत त्यानं लहानसहान नद्या पाहिल्या होत्या. उत्तरेंत गंगेचं विस्तीर्ण वाळवंट दृष्टीस पडतांच त्याला देहभान राहिलं नाहीं. भागीरथीच्या दर्शनानं त्याचं काव्यमय अंतःकरण उचंबळून आलं आणि त्याच्या मुखांतून सहजगत्या—

अयि गंगे भागिरथी !
लोळावें वाटतें तुझ्या पुलिनीं

श्रद्धेच्या पंखावर...

श्रद्धेच्या पंखावरि बसुनी
चाललों झुलत वरिवरि गगनीं

अरे उद्धता दांड धाडशी
एकसारखा हाक मारशी
वस्त्र धरुन कां खालि ओढिशी ?
रे ! फुटतिल हाडें आपटुनी.

रक्तप्रिय खादाड अधाशी
ब्रम्हांडहि जरि सारें खाशी
खा खा न सरे सदा उपाशी
कां टाकशील मजही गिळुनी ?

सक्त किती रे ! तुझा पहारा
चोरापरि हलवितां न दारा
निघे न हलतां घरांत वारा
तरि नजर हलेना मजवरुनी.

तुझ्या न डोळां गुंगि शिवे का ?
अरे ! चळवळचा शीण न ये का ?
फूलहि न कधीं तुज भुलवी का ?
तिमिरांतहि बघशी कां झटुनी ?

सर्व जन्म रे ! तुला दिला मी
पळभर न रमूं का निजकामीं
बोलवितां मज माझा स्वामी
जाउं दे विनवितें तुज नमुनी.

मार्ग सुचविती गिरि, तरु, निर्झर
फुलें चढविती निज वासावर
वल्हवी वरवर वारा सत्वर
नभ बोलवितें डोळे भरुनी.

इंदूर
२२-११-२० } —भा. रा. तांबे

स्वच्छंदें माहेरीं
लोळावें जेंवि लाडक्या मुलिनी

हे उद्‌गार उद्रेक पावले. या उद्‌गारांत जितंत काव्य नाहीं असं कोण म्हणेल ?" या विधानास साक्ष म्हणून ते केकावलींतील 'म्हणोन कवितासुता तुज समर्पितों साजिरी' इत्यादि कांही केका म्हणून दाखवत. तुकारामाइतकीच मोरोपंतांवर त्यांची भक्ति होती. त्यांच्या आर्याभारतांतील कित्येक स्वभावचित्रें उत्कृष्ट कलेचे नमुने आहेत असें त्यांचें मत होतें.

भावगीत गेय, तेव्हां तें मात्रिक असावें आणि त्याचें बाह्य स्वरूप त्रुटित व सुटसुटीत असावें या विषयीं तांबे सदैव दक्ष असत. भावाचा उद्रेक अल्पकाल असतो, तेव्हां भावगीत आटोपसर असणें केव्हाहि स्वाभाविक होय. ते स्वतः भावकवि असल्यामुळे त्यांची प्रदीर्घ रचना जवळजवळ मुळीच नाही. 'महाप्रस्थान' हें त्यांचें खंडकाव्यहि दहाबारा गीतांच्या खंडांनीं पूर्ण झालें आहे. भावगीताचा उत्कृष्ट मसाला म्हणून ते फोनोच्या तवकडीवरील एखादी 'हिन्दी चीज' समोर ठेवण्यास सांगत. एकदा फोनोवर प्यारासाहेबांची

कहाँ जागे सारी रात ?
नैना कुसुंबरंग हो गये
एक तो मैं बडे की बेटी
दूजो ठाडों जमादार

ही आर्त 'चीज' वाजत होती. तांबे म्हणाले, "हें सर्वोत्कृष्ट भावगीत आहे. घरीं आपल्याला एकटी टाकून दुसरीकडे रात्रभर जागरण करणाऱ्या पतीवर नाराज झालेल्या मानिनीचं स्वभावचित्र या गाण्यांत उमटलं आहे. तिच्या मानधन मनाची सारी तळमळ, जळजळ यांत व्यक्त झाली आहे. हें खरं काव्य आहे."

काव्यांत भावाला व रसाला मान आहे; त्यांत कल्पना गौण आहे असें तांब्यांचें म्हणणें असें. यामुळे त्यांच्या कृतींत कल्पनेच्या भराऱ्या आढळत नाहीत. कल्पना हा बुद्धीचा खेळ आहे. कल्पनेनें क्षणभर विस्मय वाटला तरी हृदय हालत नाही. अर्थात् तिला ठराविक मर्यादा हवी असें त्यांचें म्हणणें असे. त्यांना विकृत व अभद्र कल्पना नापसंत असत. केशवसुतांच्या 'जिनें मजला वेडा केलें तिच्यावरी हीं फिर्याद' या कवितेवर ते आक्षेप घेत. ते म्हणत, "कवितादेवीवरील हें रूपक विकृत आहे. जियं कालिदास 'वागर्थाविव संपृक्तौ वागर्थप्रतिपत्तये । जगतः पितरौ वंदे पार्वतीपरमेश्वरौ' असं म्हणतो आणि भवभूति 'आकस्मिक प्रत्ययभासां च देवीं वाचमभ्युदैवयत्' असे उद्‌गार काढले, तियं आम्ही अभद्र कल्पना करावी हें अनुचित होय." माझ्या 'प्रतिभा-पिशाच्च जेव्हां होतें मनांत जावें' या कल्पनेवर ते अत्यंत संतापलें होते. ते म्हणाले, "या स्थळीं प्रतिभा अनादि माता करिते प्रवेश स्वांतीं असा बदल करा."

काव्यांत अलंकार आणि शब्द यांनाहि ते दुय्यम स्थान देत. ते म्हणत, "मनांत स्पष्ट व यथार्थ भाव असला म्हणजे शब्द आपसूक सुचतात आणि यमकंहि नकळत जुळतात. शिवाय यमकें नसलीं तरी काव्याचं मूळ सौंदर्य बिघडत नाही. याचं प्रत्यंतर म्हणून ते वंटय्या नायडूंचा—

उडूंचे लेवोनी नग, शशिकलेचा बिजवरा
ललाटीं शुक्राची चटक टिकली लेवुनी उपा
कुसुंबी शालूचा पदर सुदृशी लेवुन करें
दिशांतें ये द्याया शुभ हळदकुंकु स्मितमुखीं

हा निर्यमक श्लोक म्हणत असत. शब्दांच्या मधुरतेविषयी ते चोखंदळ नसले तरी त्याच्या समर्पकतेकडे विशेष लक्ष देत. स्वतःच्या काव्यांतहि ते क्वचित् शाब्दिक बदल करीत. 'रुणुझुणु ये !' या भूपाळींत आरंभीं

दिग्ललना वीतमुखीं
रत्नदीप कनकतबकिं
घेउनिया वाहति या माझ्या चिमण्याला

असा पाठ होता; तेथे त्यांनी 'माझ्या चिमण्यालाबद्दल 'बालभास्कराला' असा केला व श्लेष साधला.

तांबे-समग्र-कवितेच्या नवीनतम संस्करणांत अनेक पाठभेद आढळतात. अर्थात् ते तांब्यांच्या अनुमतीने केले आहेत; परंतु क्वचित् मुळांतील पाठच सरस वाटतात. वानगीदाखल 'बिजली जशि चमके स्वारी' ही कविता घेऊं. मूळांत 'धूलिने धुंद दिक्चारी' ही ओळ अगोदर असून 'बिजली जशि चमके स्वारी' ही ओळ नंतर होती. आता हा क्रम उलट केला आहे; त्यामुळे मुळांत अंधारांत चमकणाऱ्या विजेची जी कल्पना होती ती आता नष्ट झाली आहे.

तद्वत् 'कशि वाभि ! मूर्ति 'मम्लारी' या मूळ शद्वांत 'मल्लांचा अरि' असा जो श्लेष होता तो आता राहिला नाही. शिवाय या शद्वाने तांव्यांच्या अिदूर येथील वास्तव्याचा बोध होत असे, तो आता नाहीसा झाला आहे.

तांबे आपलें काव्य रसापकर्पक वाटूं नये अितपतच त्यांचे परिप्करण करीत. 'विधवेचें स्वप्न' ही कविता प्रथम काव्यरत्नावलींत प्रसिद्ध झाली तेव्हा तिच्या अंतीं एक श्लोक अधिक होता; तो रसापकर्पक होअील म्हणून संग्रह प्रसिद्ध करतांना त्यांनी गाळला. त्याप्रमाणेच 'विजली जशि चमके स्वर्री' ही कविता मूळ मनोरंजनांत आली त्या वेळीं तिच्या शेवटीं 'पति असे लाधले जीतें । वीरसू वीरपत्नीतें' हें कडवें होतें, तें त्यांनीं संग्रहांत कमी केलें. आता नवीन आवृत्तींत त्यांनी त्याऐवजी एक नवें कडवें जोडून उजळा दिला आहे.

तांव्यांना सोंगाढोंगाचा मनापासूनतिटकारा असे. ते म्हणत, "आपल्याला जें वाटतं तें बोलायला कचरूं नये." शृंगारावरील आक्षेप त्यांना पटत नसत. ते म्हणत, "तत्वज्ञान थोर आहे म्हणून प्रणय थोर नाही का ? प्रणयाचं देवादिकांनाहि वेड आहे." हें विधान करतांना ते हातवारे करीत करीत—

एडका मदन, तो केवळ पंचानन
लाथ मारली शंकराला,
केला ब्रम्ह्याचा चूराडा

ही लावणी मोठ्या आवेशाने म्हणून दाखवत. स्वतःची 'चल जळो ज्ञानविज्ञान गडया !' ही कविताहि ते अशीच जोषाने म्हणत.

काव्यांत निसर्गाला स्वतंत्र स्थान देणें त्यांना संमत नसे. ते म्हणत, "सृष्टीचं सविस्तर वर्णन करण्यापेक्षा तिच्यांतला केवळ आनंद लुटावा." यामुळे त्यांच्या संग्रहांत निव्वळ निसर्गावर लिहिलेली अशी एखादी-दुसरीच कविता सापडते. स्वतःच्या शद्वचित्रात्मक कवितांत त्यांनी निसर्गाचा पार्श्वभूमीप्रमाणे उपयोग केला आहे. यामुळे त्या कवितांना उठाव मिळाला आहे. याचें प्रमाण म्हणून—घट भरे प्रवाहीं बुडबुडुनी, तें दूध तुझ्या घटांतलें, आज तो कुठे जिवाचा चोर, घट तिचा रिकामा—इत्यादि कविता उल्लेखनीय आहेत.

कवींत व शास्त्र्यांत मूलतः फरक आहे. कवीने उपदेशकाचा अगर प्रचारकाचा आव आणूं नये असें तांव्यांचें ठाम मत होतें. कवि आपल्या काव्यांतून नीतिपाठाचे 'डोझ' पाजूं लागला म्हणजे त्यांत काव्य शिल्लक राहात नाही—त्यास शुष्क व्याख्यानाचें स्वरूप येतें असें ते म्हणत. या मताचा पाठपुरावा करतांना ते वर्ड्स्वर्थचें उदाहरण देत. ते म्हणत, "डॅफोडिल्समधल्या

I wandered lonely
as a cloud
That floats on high
over vales and hills,
And all at once
I saw a crowd,
A host of golden
daffodils;
Ten thousands saw I
at a glance
Tossing their heads
in a sprightly dance

या चरणांत 'वर्ड्स्वर्थ' मधला कवि दृष्टीस पडतो परंतु Excursion मधल्या कांहीं ओळींत व Lines written above Tintern Abbey' मधल्या कांहीं भागांत त्याच्यांतला जो 'उपदेशक' नजरेस पडतो, तो काव्याची नासाडी करतो." यावावत ते माधवानुजांच्या 'सखे ग सुरेख संगम किती' या कवितेचें उदाहरण देत. या कवितेच्या आरंभीच्या

किति विशाल तट हे अहा !
प्रिय सखे, उभी तूं रहा
क्षणं येथिल शोभा पहा

या कडव्यांत 'मोदमग्न कवि' आहे. परन्तु दुसऱ्या कडव्यांत ' संगमाच्या वाळवंटांतील ही वाळू घेतली की बोटांच्या फटींतून ती कणाकणाने निखळूं लागते, तद्वत् आपलें आयुष्य हळूहळू सरत आहे' या नैतिक विचाराने त्याचा 'चिंतातुर उपदेशक' बनला आहे. त्यांच्या या मतानुसार केशवसुतांची 'तुतारी' म्हणजे एक व्याख्यान ठरतें. ते म्हणत, "विधवा विवाहावर व्याख्यान देण्यापेक्षा विधवेच्या अंतरंगांत शिरून तिच्या भावनांना तोंड फोडणं कलेच्या दृष्टीनं अधिक परिणामकारक

व हितावह आहे." तांब्यांच्या राष्ट्रीय काव्यांत देखील विशिष्ट पंथप्रणालींचा प्रचार नाहीं. 'रुद्रास आवाहन' या क्रांतिदर्शी रौद्र कवितेप्रमाणे 'वाटलें, नाथ! हो—' हीं अहिंसात्मक शांत कविताहि त्यांच्या कलात्मक लेखणींतून उतरली आहे. जें दृश्य अंतःकरणास स्पर्शून जाई तें त्यांच्या काव्याचा विषय होई-

उपदेशपर काव्याप्रमाणे शुष्क तात्त्विक काव्यावर तांब्यांची नाराजी असे. ते म्हणत, "समीकरण हें काव्याचं शील आहे, पृथक्करण नव्हे. तत्वज्ञान हवं, पण तें उघडंनागडं नको." या त्यांच्या विचारसरणींमुळे केशवसुतांचीं 'शापूर्जी', 'प्रीति मिळेल कां बाजारी?' इत्यादि काव्यें त्यांच्या नावडीचीं होतीं. ते म्हणत, "प्रीतीची मीमांसा करण्यापेक्षा कवींनं आपल्या नाट्यपर प्रतिभेच्या बळानं व सृजनशक्तीच्या योगानं प्रत्यक्ष प्रीतीची मूर्ति निर्माण करावी म्हणजे झालं." या दृष्टीने त्यांची 'दरडीवरील वाला' ही कविता वाचनीय आहे. स्वतः तांबे नाट्यपद्धतीचा अवलंब करून तात्त्विक कविता लिहीत व ती नीरस वाटूं नये एतदर्थ तिच्यावर कोमल भावनांचें झिरझिरीत आवरण चढवीत. याचें प्रत्यंतर म्हणून त्यांच्या 'या वेळीं माझ्या ये रमणा!,' 'घातलीं एकदा अता उडी' इत्यादि कविता उल्लेखितां येतील.

ज्यांत वाच्यार्थापेक्षा व्यंगार्थाला महत्व आहे अशा ध्वनिकाव्यास तांबे विशेष मानीत. ते म्हणत, "व्यंगार्थ म्हणजे संदिग्ध भाषा नव्हे. व्यंगार्थ म्हणजे सूचकता." खुद्द तांब्यांचीं काव्यें अत्यंत सूचक आहेत. त्यांच्या 'दृष्ट हिला लागली' या कवितेच्या

> **विशाळ डोळे लावुन वरती**
> **चित्रें पाही जशि काकुळती**
> **मधेच दचकुन कान देइ ती**

या, आणि

> **करकरीत तोन्हीसांजा ही**
> **देवदर्शना एकलि जाई**

या चरणांत विलक्षण सूचकता आहे. उपवर मुलगी असें कां करते हें न सांगताहि कळण्यासारखें आहे. याचप्रमाणें 'घट भरे प्रवाहीं बुडबुडुर्नी' या कवितेंतील

> **सळ डोळ्यांवर, काय पाहशी?**
> **कान देउनी काय ऐकशी?**
> **अचंचळ उभी व्याकुळ दिसशी!**

या चरणांतहि स्त्रीस्वभावदर्शक मजेदार सूचना आहे. एकाकिनी असें कां करते हें कुणाला सांगण्यास का हवें-?

ईश्वराच्या अस्तित्वावर तांब्यांची अढळ श्रद्धा होती. ते अंतःकरणानें भाविक होते. यामुळे त्यांच्या व्यापक वृत्तीस वैलापिक कारुण्याचा व नश्वर नैराश्याचा स्पर्श जाणवत नसे. बेसूर रडगाणें त्यांना अगदी नको असे. जगांत सर्व कांहीं भल्यासाठीं आहे असा त्यांचा दृढ विश्वास होता. याचा परिणाम असा झाला आहे, कीं ब्राउनिंगप्रमाणे त्यांचें काव्यहि अनंत आशावादानें ओतप्रोत भरलें आहे.

> Come, grow old along with me
> The best is yet to be

असें ब्राउनिंग सांगतो; त्याचप्रमाणे तांबे—

> **फूल गळे, फळ गोड जाहलें,**
> **बीज नुरे, डौलांत तरु डुले,**
> **तेल जळे, बघ! ज्योत पाजळे,**
> **कां मरणिं अमरता ही न खरी?**

असें म्हणतात. या दृष्टीनें 'घन तमीं शुक्र बघ! राज्य करी', 'उद्याची गति', 'महाप्रस्थान', 'मरणांत खरोखर जग जगतें' इत्यादि कविता मननीय आहेत.

तांब्यांच्या साहचर्यात जीं त्यांचीं काव्यविषयक मतें मार्गदर्शन म्हणून माझ्या कानांवरून गेलीं तीं येथे नमूद करण्याचा मीं यथामति प्रयत्न केला आहे. त्यांच्या कवितेचा आस्थेवाईक अभ्यास करणारांस थोडेंफार सहाय्य व्हावें येवढयाच एका अपेक्षेने मीं हा संक्षिप्त लेख लिहिला आहे.

(मनोहर मे ४२)

राजकवि ताम्बे व संगीत

लेखक

श्री. ग. न. पंडित

'गीतं वाद्यं तथा नृत्यं संगीतमिति कथ्यते' ही संगीताची व्याख्या आहे. राजकवि तांबे यांच्या कवितांतील संगीताचा विचार करतांना वरील व्याख्येतील वाद्य व नृत्य या संबंधी इतकेच म्हणतां येईल कीं त्यांच्या गेय अशा ज्या कविता आहेत त्या वाद्याच्या साथीवर सुंदर रीतीने म्हणता येतात. आणि त्यांच्या कांही कवितांवर नृत्यहि बसवितां येण्यासारखे आहे. परंतु प्रस्तुत लेखांत मुख्यत्वेंकरून संगीतांतील 'गीत' या विषयाबद्दलच विचार करावयाचा आहे.

स्वतः तांबे यांना संगीताबद्दल किती आस्था होती हे त्यांच्या 'संगीताचें मराठीकरण' या लेखावरून स्पष्ट दिसून येते. (पहा 'तांबे व्यक्ति आणि कला', खण्ड २ रा, पान १४९)

एक गमतीची गोष्ट प्रत्ययास अशी येते कीं उपरिनिर्दिष्ट लेखाच्या शेवटीं पान १५८ वर त्यांनीं "आधीं मराठीचे तानसेन, सदारंग, अदारंग उत्पन्न व्हावयास पाहिजेत मग ते मराठीच्या फुलांत सुगंध भरूं शकतील आणि हिन्दुस्थानी तोडीचे गायन मराठींत होऊं शकेल' असे विधान करून 'सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यांत तानसेन पाठीव' अशी प्रार्थना केली आहे. त्या तानसेनाचा अवतार होण्यापूर्वीच रागदारीचे संगीत ज्यांत ओतप्रोत आहे अशा पुष्कळशा कविता त्यांनी स्वतःच निर्माण केल्या.

नाट्य-वाङ्मयांत रागदारीच्या चीजा नाट्याचार्य खाडिलकर यांनी प्रसृत केल्या व त्या नटवर्य बालगंधर्वासारख्या मधुर गायकांनी म्हटल्यामुळें लोकांच्या तोंडीं बसल्या व सहजगत्या समाजांत रागदारीच्या गायनाची आवड वाढूं लागली.

रंगभूमीवर रागदारी गाण्याचा प्रवेश करवून देण्यांत जसे नाट्याचार्य खाडिलकरांना अग्रेसरत्व आहे, तसेच भावगीतांत रागदारीचे गाणें प्रथम प्रसृत करण्याचें अग्रेसरत्व राजकवि तांबे यांचेकडेच जाईल.

राजकवि तांबे यांनी ज्या कविता रागदारींवर रचल्या त्या बहुतेक उत्तरकालीनच आहेत. त्यांना गायनाची फार आवड असे. गळा नसल्यामुळें ते बहुतेक समाजांत कविता म्हणून दाखवीत नसत. परंतु त्यांच्या कवितेंत संगीत व काव्य याचा इतका मधुर मिलाफ झालेला आहे कीं त्यांच्या कविता म्हणून दाखविणारा असा एक गायकवर्ग उत्पन्न झालेला आहे.

तारुण्याच्या ऐन उमेदीत झालेल्या व स्वतः कवीस पसंत नसलेल्या गज्जलाच्या चालीवर रेकॉर्ड केलेल्या 'डोळे हे जुलमि गडे' या कवितेच्या प्रसिद्धीचें कारण कवितेंतील चटकदारपणाच होय. तांब्यांच्या कविता गाणारे श्री. गुणे हे एकदां नागपुरास केवळ गाण्यासाठी गेले होते. त्यांनी सहज एकदा त्यांची कविता म्हटली, त्यावर त्यांचें मुख्य कार्य तर राहिले एकीकडे व पक्क्या गाण्याचे दर्दी लोक देखील तांब्यांच्या कविताच ऐकण्याचा हट्ट करूं लागले. ह्या स्वतःच्या लोकांच्या गोष्टी म्हणून जरीं सोडल्या (सोडावयास नको) तरी कोल्हापुरांतील प्रसिद्ध गायिका अञ्जमबाई यांनी दोन कविता रेकॉर्डींगसाठीं मागितल्या. त्या तांब्यांच्या कवितेच्या चटकदारपणावर इतक्या लुब्ध झाल्या कीं शेवटी त्यांनी परवानगीची वाट देखील न पाहतां त्यांचें रेकॉर्डींग करून टाकलें.

तांब्यांच्या कवितांचा एक गट असा पडतो कीं ज्यांच्यांत कविता वृत्तमय किंवा अगदी साध्या चालीच्या आहेत या गटांत जवळ जवळ ८८ कवितांचा समावेश होतो. (संदर्भ पटवर्धन संपादित तांबे- कविता, प. आ.)

वृत्तमय कविता २९, जाति चन्द्रकांत ११, जाति भूपति ९, जाति अक्रूर १, जाति उद्धव ४, जाति अभिमन्यु ३, जाति मदनमंजरी २, जाति समुदितमदना ५, ओव्या ५, अभंग १, जाति मुद्रिका १, जाति भुवनसुन्दर १, जाति जीवनध्वनी १, पडक्षरी छंद १, वियद्‌गंगा १, जाति शरण १, सरस्वतीस्तोत्र १, जाति भवानी २ तुझ्या गळा १, प्रणयवंचिताचे उद्‌गार १, चिवचिव चिमणी १, जाति फुलवेल १, आनंदी आनंद १, तृणाचें पातें १, जाति महाकाली १ आणि वाटेले नाथ हो १.

या कविता साधारणपणे कोणासहि म्हणतां येतील अशा आहेत. अर्थात् राजकवि तांबे यांनाही आरंभीं आरंभीं बायाबापड्यांच्या गाण्यांच्या चालीं किंवा लावणीवजा चालीच कवितेंत घ्याव्या लागल्या. हा गट गायक वर्गानें अगदीं त्याज्य म्हणून काढलेला नाहीं. उत्तम गायकाचे तोंडीं वृत्त काय, ओव्या काय, गज्जल काय किंवा लावण्या काय, अप्रतिम लागतात. या प्रकारांत देखील रागदारीच्या सुन्दर छटा दाखवितां येतात. लावण्याच्या चालींचें गायन बहुधा दीपचंदी, घुमाळी-सारख्या दुडकी तालावर चालते.

या नंतर दुसरा एक मोठा गट. यांतील कवितांच्या जातींचें संशोधन व नामकरण कै. प्रा. पटवर्धनांनी संपादलेल्या काव्यसंग्रहांत झालेलें आहे व त्यांचे रागही कवितेच्या आरंभीं दिलेले आहेत. तद्नंतर कांहीं कवितांचा असा एक अल्प गट आहे कीं ज्यांच्या जातींचें नामकरण कै. प्रा. पटवर्धनांनीं केलेलें नाहीं, परंतु ज्यांचे राग मात्र निर्देशित केलेले आहेत. गायक वर्गाच्या आवडींचें हेंच क्षेत्र होय.

परंतु या विषयीं विवेचन करण्यापूर्वी गायनाच्या बैठकींत बसलेल्या श्रोतृगणाचें मनोविश्लेषण करणें आवश्यक आहे. गाण्याचे बैठकींत बसणारा सर्वच श्रोतृसमाज गायनाच्या सर्व प्रकारांनी मोहित होणारा नसतो पहिला वर्ग गवयाच्या विलंबित लयीने, आलाप तानानें, मींड वा हरकतीने लुब्ध न होतां उठून तरी जातो किंवा निद्राधीनच होतो. दुसरा एक आणखी वर्ग असा कीं ज्याची मनोभूमिका वर्गांतील काळ्या फळ्याप्रमाणे असते. त्यावर वाटेल त्या प्रकारचें गाणें लिहा. वर्ग (बैठक) संपल्यावर तो काळाचा काळाच. ह्या दोन वर्गाहून अगदी वेगळा एक वर्ग असतो. ह्या वर्गांतील लोकांची वागिंद्रियाशिवाय सर्व इन्द्रियें फार संवेदनक्षम असतात. बेताला, कणसुरा आदि गायनांतील त्रुटचा तत्काल त्यांच्या भ्रुकुटिस्फुरणाने वा नेत्राकुंचनाने दृगोचर होतात. याची भूमिका एका साहित्य क्षेत्रांतील मूक समालोचकाप्रमाणे होऊं लागते. ह्याच्या हृन्मन्दिराचा घुमट इतका मोठा असतो कीं गाणे संपल्यावर देखील तेथे ध्वनि–प्रतिध्वनि उमटत असतात. कला ही अनुकरणप्रिय असल्याने अशा श्रोतृसमुदायांत काव्यनिर्मितीच्या वेळीं ऐकलेल्या चीजांच्या चाली अन्तर्यामांतून निघून वरचेवर मदत करतात. गायन जें समाजांत प्रसृत होतें तें याच वर्गाकडून. तांबे हे माझ्या मतें तिसऱ्या वर्गात बसतात व त्यामुळेच त्यांच्या निर्मितींत रागदारीस एवढें महत्त्व आलें आहे.

त्यांच्या गेयानुकूल कवितांचें जें कै. पटवर्धन यांनी जातीकरण केलेलें आहे तें विचारांत घेतलें असतां असें मुळीच म्हणतां येणार नाहीं कीं राजकवि तांबे यांची गायनानुकूल अशी प्रत्येक कविता लिहिण्यापूर्वी ती कविता अमक्या रागांत लिहिली असली पाहिजे किंवा त्या रागांतील एखादी विशिष्ट चीज चालीकरतां योजून मग त्या चालीवर कविता रचली. एकच नववधू जाति. पण त्या जातींतील निरनिराळ्या कवितांवर निरनिराळे राग लिखित आहेत. एवढेंच नव्हें तर त्या त्या कविता गायिल्याहि जातात. याचें कारण असे की गवयास कोणत्यातरी तालाच्या आवर्तनांत बसणारीं अशी पदरचना हवी असते. तालाचे मात्रे मात्रेस रचनेच्या लघु गुरु मात्रा मिळत असल्यास, तो ती रचनेच्या विषयानुरूप वाटेल त्या रागांत गाऊं शकतो. नववधू जातीची रचना त्रितालाचे आवर्तनांत बसविली आहे व प्रत्येक चरणांत १६ मात्रांचा मोजीव हिशोब आहे. त्यामुळे ती रचना अथवा इतर जातींतील रचना गवयास गेयसुलभ झालेल्या आहेत व विषयानुरूप रचनेच्या पश्चात् संगीतज्ञाच्या आवडीनुरूप त्यांचे राग-संशोधन झालेलें आहे.

भावोद्दीपन हाच हेतु कोणत्याहि कलेचा असतो. चित्रकला रंगरेखांच्या व छायाप्रकाश यांच्या मदतीने हें कार्य करते, तर नृत्यकला हावभाव व वेशभूषा यांच्या मदतीने करते. संगीत व काव्य ह्यांच्याजवळ मात्र शब्द आणि सूर या शिवाय कांहीं साधन नाही. संगीततज्ञास आपल्या संगीताने जगास वेडावून टाकायचें असल्यास शब्दांची विलासभूमि तयार करावी लागते आणि काव्याकारासहि आपल्या काव्याने जगास मोहून टाकावयाचें असल्यास हृदयांतील भावना सुरेल शब्दांत मांडल्याशिवाय चालावयाचे नाहीं. इतक्या ह्या दोन्ही कला परस्परावलंबित आहेत. विषयवर्णनाची पहिली पंक्ति जिला ध्रुपद किंवा पालुपद म्हणतात ती इतकी ठसकेबाज व अर्थपूर्ण पाहिजे कीं कांहीं वेळ तिच्या आवर्तनावरच श्रोत्यांना झुलत ठेवतां आलें पाहिजे. उदा- 'कंकर मार जगाई' किंवा 'निर भरन कैसे जाऊं सखीरी' वगैरे हिन्दी चीजांचे मुखडे ऐकल्याबरोबर श्रोत्यांचें मन लगेच आकर्षिले जाते. हीच गोष्ट राजकवि ताम्बे यांच्या कवितेसंबंधीं आहे. त्यांच्या कवितेची

पहिली ओळख इतकी भावपूर्ण व सहजसुन्दर आहे की ही ओळ ऐकतांच वृत्ती रसलीन होते.

याशिवाय हिन्दी चीजांप्रमाणें राजकवि ताम्बे यांच्या कवितांतून जीं गृहचित्रें किंवा ज्या संसारिक भावना लोकांच्या डोळ्यांसमोर नित्य खेळत असतात त्याचेच यथातथ्य चित्रण कलापूर्ण व हलक्या हाताने केलेले आहे. त्यांची शद्वरचना विषयानुरूप गंभीर, कठोर व ललितवर्णात्मक असते. हीच तऱ्हा चीजांची आहे. वादळ-वर्णन भयंकर करावयाचें असल्यास 'उमड घुमड घन गर्जत आये' अशीच दीर्घ-विरामी पंक्ती यावयाची. तीच वसंत ऋतूंतील बहार दाखवावयाची असल्यास 'कलियन संग रंग' अशी मृदुल व ललित पंक्ति येते. ताम्ब्यांच्या कवितेंत अशा प्रकारचें साम्य म्हणून अनुक्रमें 'कडकड कडकड तडित कडाडे' आणि 'वदन–मदन–रंग–सदन'–या कवितांकडे बोट दाखवितां येईल. या साम्यामुळेच राजकवि तांबे यांच्या कविता रागदारी गायकवर्गास प्रिय झाल्या आहेत. रागदारीच्या कवितांत नववधू, प्रणयप्रभा, सृष्टलता, वरमंगला वगैरे अनेक जातीच्या कविता आहेत व कांहीं अपवाद सोडून साधारणतः राग योजनाही विषयानुरूप झाली आहे. याशिवाय त्यांच्या कवितेचा आणखी एक विशेष गायक वर्गाच्या दृष्टीने असा आहे की कवितांच्या सुरुवातीच्या ओळींचा स्वरालाप घेतला तर गवयाच्या तोंडीं असलेल्या प्रसिद्ध चीजांच्या स्वरालापाशीं हुबेहूब साम्य प्रतीतीस येते. उदाः

राग भैरवी दिनान्ती श्रमान्तीं भवानी दयानी

राग यमनकल्याण दृष्ट हिला लागली
चयन नहीं दिनरात

राग देस आला हा दारीं उभा
पियाकर घर धरकत है

राग ललत कवणें मुलखा जासी
पिहु पिहु रटत प्रपीयरा

राग दुर्गा छेड सखे दुर्गा मधुरागिणी
देवी भजो

राग सोहनी आज फिरुनि कां दारिं
काहे अब तुम आवे

२०–२२ कवितांच्या या तिसऱ्या गटांत कांहीं थोडयाशा कविता आरंभीं आरंभींच्याही आहेत व बऱ्याचशा कविता ग्वाल्हेर येथे लिहिल्या आहेत. छन्दोरचनाकारास रख्या कसोशीने संशोधन करण्याऱ्या संपादकाच्या तावडींतूनही राजकवि तांबे यांच्या कांहीं कविता जातिकरण संस्कारांतून निसटल्या याचा अर्थ इतकाच कीं प्रचलित जातींपेक्षां निराळ्या निराळ्या चालीवर या कविता लिहिल्या आहेत.


तांबे यांचे आयुष्यक्रमाचे अवलोकन केल्यास हे सहज दिसून येते कीं बाल्यावस्थेपासून त्यांना उत्तम उत्तम गायकांचे (मग ते हरदास असोत किंवा गवई असोत) गायन श्रवणाची नित्य नवीन संधी मिळाली होती. खुद्द त्यांचे बंधु गणपतरावजी हे प्रसिद्ध हरिकीर्तनकार म्हणून प्रसिद्ध आहेत. आयुष्यांतील बराचसा काल देवास, इन्दूर व लहानसहान राजेरजवाडे ह्यांच्या राजधानींच्या ठिकाणी त्यांनी व्यतीत केला होता. देवासला काय किंवा इन्दूरला काय हरीहरबुवा, केशवराव आप्टे, सखारामपंत पखवाजिया वगैरे कलावंतांच्या तोंडून गायनवादन ऐकण्याचे त्यांना पुष्कळसे प्रसंग आले असतील. परीक्षा-कार्यवाह म्हणून ते ग्वाल्हेरीस राहूं लागल्यापासून तर या बाबतींत फारच अनुकूल अशी परिस्थितो निर्माण झाली होती. प्रसिद्ध गायनाचार्य राजाभैया पूंछवाले यांचे शिष्य परंपरेंतील अग्निहोत्री बंधूंची जोडी शेजाराला, रा. गुणे यांच्यासारखे नातेवाईक व त्यांच्या कवितेसंबंधी विशेष आस्था बाळगणारे त्यांचे गवई केव्हांही त्यांचे हाकेस ओ देण्याला तयार होते. ताम्ब्यांचे मन कलापूर्ण, सूक्ष्मसंस्कारक्षम व परिणतप्रज्ञ असल्याने त्यांनी या प्रसिद्ध गायक मंडळींकडून ऐकलेल्या बऱ्याचशा चालीवर कविता लिहिल्या आहेत.

माझे ग्वाल्हेरीस १॥ वर्ष वास्तव्य असतांना त्यांच्या हयातींत सहवासाचे सौभाग्य मला लाभले आहे. त्या स्मृतिरम्य काळांत मी त्यांचेबरोबर कित्येक बैठकींत गाणें ऐकावयास गेलो आहे व त्यांच्या गानलुब्ध वृत्तीचे प्रत्यक्ष चित्र पाहण्याची मला सुसंधी प्राप्त झालेली आहे. उत्तम गाणे ऐकल्यानंतर रोजच्या आमच्या संध्याकालीत बैठकींत आम्ही ऐकलेल्या रागाची कित्येक दिवस चर्चा करीत असूं. असे किती तरी प्रसंग अजून आठवतात कीं घरीं मुलांस शिकवण्यास आलेले रामजीभैय्या अग्निहोत्री एका खोलींत गाणे शिकवित बसलेलें आहेत. त्यांनी एखादी नवीन

चीज सुरू करावी. इकडे आमचे साहित्यविषयक बोलणें चालले असावे. चीज ऐकल्यावरोबर राजकवि तांबे यांनी त्यास बोलावून त्यांच्याकडून चीज फिरून गावबून घ्यावी व मग 'गायनकला ही काव्यापेक्षां श्रेष्ठ आहे' असे राजकवि तांबे यांचे सिद्धांत–मंडन व्हावे. ललित कलेच्या या रम्य पुष्पवाटिकेंत एक मन भृंग्याप्रमाणें लीन तर दुसऱ्या व्यवहारी मनास दूरवर असलेल्या विन्हार्डी पोहोंचण्याची घाई ! मध्येंच त्यांची स्फूर्ति जागी व्हावी, मग महिनाभर रोज नवीन रचलेल्या कविता ऐकावयाला मिळाव्या. कधी त्या साध्या ओवीरूपानें प्रगट होत तर कधी त्या उत्तम व प्रसिद्ध चीजेच्या चालीवर व उत्तम रागभूपेंत व्यक्त होत. 'दिव्यांगनेची ओढ', 'घर राहिले दूर,' 'कां उभी तूं तरी' वगैरे कविता याच कालांतील आहेत. ह्या कविता रचण्यापूर्वी 'भवानी दयानी' सारख्या हिन्दी चीजा त्यांनी ऐकल्या होत्या व त्या त्या चालीवरच त्यांना ह्या कविता लिहिण्याची स्फूर्ति झाली.

पुढे पुढे ग्वाल्हेरच्या पूर्णानुकूल अशा संगीत वातावरणांत त्यांनी हिंदी चीजेनुरूप त्याच रागांत व त्याच चालीवर कविता रचण्यास सुरवात केली होती. चीजेप्रमाणेच हुबेहुब कविता लिहायची म्हणजे चीजेच्या केवळ मात्रा मोजून काम भागावयाचे नाही. उलट चीजेचा लयक्रम लक्षांत घेऊनच रचना व्हावयास पाहिजे. चीजेंत कुठे कुठे दीर्घ अक्षरमुद्रां द्रुतगतीनें म्हणजे ऱ्हस्व मात्रेच्या कालांत उच्चारलें जाते.

आणि कुणी सांगावे, तांब्यांनी कदाचित् हुबेहुब चीजेप्रमाणें कविता पुढे निर्माण केल्याहि असत्या !



संध्याछाया भिवविति हृदया-

: लेखक :

श्रीपाद डोंगरे, मुम्बई.

(कविवर्य भास्कर रामचंद्र तांबे दि. ६ डिसेंबर १९४१ या दिवशीं दिवंगत झाले. श्री. श्रीपाद डोंगरे (सहसंपादक 'लोकसत्ता') हे त्यांच्या अंतकाळीं उपस्थित होते. राजकवींच्या अखेरच्या घटिकांचें त्यांनी पुढील ले त हृदयस्पर्शी वर्णन केलें आहे — संपादक)

३ डिसेंबर १९४१ ला भास्करराव तांबे यांची प्रकृति बिघडल्याचें वृत्त माझ्या वडिलांनी मला सांगितलें ते नुकतेच त्यांच्याकडे जाऊन आले होते. मामा–भाच्यांची ही अखेरची भेट होती. माझ्या वडिलांवर भास्कररावांचा फार लोभ होता. कोणत्याहि अडचणी, दुःख ते माझ्या वडिलांना मोकळेपणाने सांगत. त्या शेवटच्या भेटींत त्या दोघांचें काय बोलणें झालें, तें मला कळलें नाही. जें कळलें ते अगदीच खाजगी स्वरूपाचें होतें. माझे वडील जुन्या जमान्यांतील एक निष्ठावंत साहित्यिक होते. परंतु साहित्याबाबत त्या दोघांची बैठक वेगवेगळ्या स्वरूपाची असल्यामुळे म्हणा, वडिलकीच्या नात्यामुळे म्हणा, अगर मामा–भाच्याच्या वयांत बरेंच अंतर असल्यामुळे म्हणा त्या दोघांत साहित्य–विषयक चर्चा फारच क्वचित्, किंबहुना कधींच होत नसे. पण त्यांच्यांत जें बोलणें होई तें मात्र अत्यंत जिव्हाळ्याचें होई यांत शंका नाही.

भास्कररावांची प्रकृति खालावली हें जेव्हा मला कळलें त्यावेळीं रात्रीचे १० वाजण्याचा सुमार होता. उत्तर हिंदुस्थानच्या ऐन थंडीचा तो मोसम. संध्याकाळीं ७–७॥ वाजतांच रस्त्यावर सामसूम होते. आमच्या घरापासून भास्करदादांचें घर मैल–दीड-मैलाच्या अंतरावर होतें. इतक्या रात्रीं ऐन थंडींत सायकलवरून जाणें म्हणजे एक दिव्यच होतें. मन स्वस्थ बसू देईना. त्यांच्याकडे जाण्याचा विचार मी माझ्या वडिलांजवळ बोलून दाखवला. एवढ्या रात्रीं आजारी माणसांकडे न जाणें बरें असा वडिलांनी सल्ला दिला, व तो मलाहि मान्य झाला. भास्करदादा ह्या आजारांतून आता उठत नाहीत असे उद्गार माझ्या वडिलांच्या तोंडून निघालेले मी ऐकले होते. यावेळेपर्यंत मी प्रत्यक्ष मृत्यु पाहिलेला नव्हता. मेलेलीं माणसें पाहिलेलीं होतीं, पण माणूस मरतो तेव्हां काय होतें याची मला कल्पना नव्हती. श्वास जोराने चालतो, आवाज घरघरतो, उचकी लागते, इत्यादि अंतकालच्या घटना मी ऐकल्या होत्या. त्या रात्रीं माझ्या डोळ्यांपुढे भास्करदादा आणि या सर्व घटना पुन्हा पुन्हा दिसत होत्या...

सकाळ झाली आणि मी भल्या पहाटेंच त्यांच्याकडे गेलों. दार बंद होतें. मी बाहेरून टकटक् केलें. बराच वेळ कोणीहि आलें नाही. पुन्हा मी टकटक् केलें. इतक्यांत भास्कररावांना खोकल्याची उबळ आली. ते काहीवेळ खोकत होते. त्यांचे खोकणें बंद झाल्यावर मी दाराची कडी जरा जोरानेच वाजवली. भास्करराव आपल्या मुलीला क्षीण आवाजांत म्हणाले, 'शांताराम बघा तर कोण आलंय् ?' (शांताला ते लाडाने 'शांताराम' म्हणत) तिने मग दार उघडलें. मला पहातांच

अनुक्रमणिका

शांतानें मंदस्मित केलें. पण त्या स्मितांत विषण्णता होती, दुःख होतें, कारुण्य होतें. मी तिला दारांतच विचारलें, 'दादांची तब्येत कशी आहे ?' माझा प्रश्न ऐकतांच तिच्या डोळ्यांत पाणी जमलें. पाहिजे असलेल्या प्रश्नाचें उत्तर मला मिळालें होतें. मी आंत आलो. पार्वतीवहिनी (भास्कररावांची पत्नी) तांब्यांच्या उशागत बसल्या होत्या. शांता व मनी तेथेंच उभ्या होत्या. मधू जवळच भिंतीला टेकून बसला होता व इतर दोन लहान मुलें अद्याप अंथरुणावर लोळत होती. मीहि भास्कररावांच्या जवळ जाऊन बसलो, सर्वांकडे नजर टाकली. काल रात्रीं जवळजवळ सर्वांनाच जागरण झाले असावे असें त्यांच्या डोळ्यांवरून मला दिसत होते.

भास्कररावांच्याजवळ मी बसलो होतो. एक हाडांचा सापळा अंथरुणावर ठेवावा तसे ते दिसत होते. मधूनमधून त्यांना खोकला येई व त्यावेळीं ते 'अग आई ग ऽऽऽ' म्हणून म्हणत. ह्या त्यांच्या हालचाली-मुळेच अद्याप त्यांच्यांत जीव आहे असे वाटे. अगोदरच त्यांची प्रकृति क्षीण, त्यांत त्यांचा हा आजार. त्यांना कमालीचे कष्ट होत आहेत हें स्पष्ट दिसत होते, तथापि आल्यागेल्या माणसांशी चार दोन शब्द तरी ते बोलतच. मी गेलो तेव्हां ते म्हणाले, 'आलास ? छान झालं ! आता कांहीं माझा भरवंसा नाही !' 'सकाळच्या प्रहरीच असं भलतं सलतं बोलूं नका भास्करदादा !' मी म्हटले. त्यावर ते पुन्हा म्हणाले, 'अरे सकाळ काय नि संध्याकाळ काय ? व्हायचंय् ते टळत नाही. मी कांहीं फार दिवसांचा सोबती नाही आता !' आणि लागलीच ते म्हणाले;

'ढळला रे ढळला दिन सखया
संध्या छाया भिवविती हृदया
लागले नेत्र रे पैलतिरी !'

त्यांनी या स्वतःच्याच ओळी इतक्या कारुण्यपूर्ण स्वरांत म्हटल्या की, त्यावेळीं तरी माझ्या मनांत चलविचल झाल्याखेरीज राहिली नाहीं, पण मला आश्चर्य वाटले ते याचे, की त्यांच्या त्या तशा अवस्थेंतहि त्यांनी वरील ओळीं अगदी अस्खलित वाणीने व अत्यंत भावनोत्कटतेने म्हटल्या ! जणू फार दिवसापासून ज्या गोष्टीची ते वाट पहात होते, ती गोष्ट आता अगदी समिप आलेली आहे. त्यांनी या ओळी म्हटल्या आणि त्यांच्या डोळ्यांतून घळघळा अश्रू वाहूं लागले. काव्यगायन इतक्या तन्मयतेने ते करीत तितक्याच तन्मयतेने त्यांनी या ओळी म्हटल्या होत्या. आपले हृदय, आपली सारी भावना त्यांनी त्या ओळींत ओतली होती ! कांही वेळ स्तब्धता पसरली, पण लागलींच भास्कररावांनी त्यांच्या नात्यांतील व्यक्तींची आठवण काढायला सुरवात केली. अमका कुठे आहे, तमका कुठे आहे, त्याची भेट झाली नाहीं, आता होणार नाही इत्यादि चौकशीस त्यांनी आरंभ केला. आपल्या नात्यांतली मंडळी आपल्याजवळ असावी, आपल्याला त्यांनी भेटावें, असे त्यांना नेहमीच वाटे. आता आपला भरवसा नाहीं असे जेव्हा त्यांना वाटूं लागले तेव्हा-पासून तर त्यांना आपल्या सर्व लोकांची फारच उत्कटतेने आठवण होऊं लागली. त्यांची बुद्धि चांगलीच जागृत होती आणि जसजसे क्षण जात होते तसतशी लोकांची आठवण त्यांना अधिकाधिक होऊं लागली.

वास्तविक मृत्यूची त्यांना मुळीच भीति वाटत नव्हती. त्यांच्या चेहऱ्यावर भीतीचा लवलेशहि नव्हता. उलट, शारीरिक अस्वस्थतेमुळे ते जीवनाला कंटाळलेच होते. तसे ते अनेक वेळा बोलूनहि दाखवीत. त्यांची एक इच्छा मात्र होती की, त्यांच्या दोन्ही मुलींचीं लग्नें त्यांच्यासमोर व्हावीं, पण विधिलिखित निराळेच होते. माणसाच्या साऱ्याच इच्छा कधी सफल होत नसतात. एक पूर्ण झाली की, दुसरी आपोआप निर्माण होते. एकींतून दुसरी, दुसरींतून तिसरी इच्छा निघतेच आणि त्या सर्व पूर्ण होण्यापूर्वीच मृत्यु झडप घालतो ! भास्कररावांच्या बाबतींतहि असेंच झालें असल्यास नवल तें काय ? त्यांच्या दोन्ही मुलींचीं लग्नें त्यांच्या समोर झाली नाहींत.

कांहीवेळ भास्करराव बोलत, कांहीवेळ मी बोलत असे आणि अशा तऱ्हेने दीड दोन तास मी तेथे होतो. काव्याचा मेरू हळूहळू ढासळत असल्याचें मला दिसत होतें, तथापि आणखी ४८ तासांतच तो पूर्ण ढासळेल अशी मला कल्पना नव्हती. मी त्यांचा निरोप घेऊन घरी आलों—

५ तारखेला संध्याकाळीं प्रा. ना. वा. पराडकर मला भेटले. भास्कररावाची प्रकृति चिंताजनक असल्याचें मी त्यांना सांगितले, तेव्हां ते म्हणाले, "होय,

शांताने मला आजच कॉलेजांत सांगितलें. मलाहि त्यांनी आज संध्याकाळीं घरीं बोलावलें आहे, पण उद्या सकाळीं मी तिकडे जाणार आहे. तुम्ही माझ्या घरीं या मग दोघे मिळून आपण जाऊं !" मी संमति दिली.

आणि ६ तारखेला आम्ही दोघेहि भास्कररावांचे घरीं त्यांना भेटायला गेलों, तो सारा कारभार आटोपलेला दिसला. 'ज्योत' विझून गेली होती ! भास्कररावांना खाटेवरून खाली उतरवून भूमातेच्या अंकीं दिलें होतें ! त्यांच्या सर्वांग अंगावर चादर टाकली होती. तांबे निष्प्राण होऊन पडले होते ! काव्य निघून गेलें होतें ! फक्त चौकट तेवढी शिल्लक राहिली होती ! आसपास चार, पांच लोक बसले होते. मुलें–मुली गुमसून रडत होत्या. स्थितप्रज्ञाप्रमाणे उभे रहाण्यापलीकडे आम्हांला कांहीं उपायच सुचत नव्हता भास्कररावांच्या डाव्या बाजूला प्रा. पराडकर व उजव्या बाजूला मी बसलो. हळूहळू भास्कररावांची मित्रमंडळी आणि नातेवाईक जमू लागले. कांहीं चहात्यांना त्यांच्या मृत्यूची बातमी कळतांच ते मिळेल तें वाहन घेऊन तेथे आले. तयारी सुरू झाली आणि 'श्रीराम' असा उच्चार करून ताटी उचलली. वीस–बावीस लोक पुढे व वीस–बावीस लोक मागें अशी ती महान् कवीची अखेरची यात्रा सुरू झाली ! ज्या कवीने सर्व महाराष्ट्राला वेड लावलें त्या कवीच्या स्मशानयात्रेला ग्वाल्हेर सारख्या मराठी संस्थानांत अवघे १०० लोकहि जमू नयेत याचें शल्य मनाला एकसारखे टोचत होते. वाटेंत कुणी तरी ओळखीचा भेटे आणि विचारी, ' काय हो, कोण ?' मी त्याला उत्तर देई. ' भास्करराव तांबे' आणि मग तो 'अस्सं' असे उद्गार काढून आपल्या मार्गाला लागे. कांहीं लोक आस्थेने विचारीत व आमच्यांत सामील होत. ग्वाल्हेर शहरांत मराठी भाषिकांची संख्या कांही कमी नाही, परंतु तेथील लोकांना 'आस्था' हा शब्द माहीत नाही. त्यावेळी ते संस्थान होते. संस्थान होते म्हणूनच तांबे राजकवि झाले हे मान्य आहे, परंतु ते संस्थान होते म्हणूनच तेथील महाराष्ट्रीय जनतेने त्यांची उपेक्षा केली. तांबे महाराष्ट्रांत असते तर...

आणि अशा तऱ्हेने त्या राजकवीची स्मशानयात्रा भरभर आडरस्त्याने स्मशानभूमीकडे निघाली. तासाभराच्या आंतच आम्ही शहराबाहेर असलेल्या स्मशानभूमीवर येऊन पोहोचलो. भटाने मंत्र म्हटले. भास्कररावांना चितेवर ठेवण्यांत आले. आम्ही कांही लोकांनी त्या चितेवर चंदनाच्या चिपट्या टाकल्या अग्नी देण्यांत आला आणि थोड्यावेळांतच अग्नीच्या ज्वाळा धडधडा वर उफाळूं लागल्या. काष्ठवत् झालेले तांब्यांचे ते शरीर क्षणार्धात रक्षावत् झाले. मराठी काव्याचा मेरूमणी पूर्णपणे नष्ट झाला. ' मधुघट ' खरोखरच ' रिकामे ' पडले ! त्याचवेळीं कुणी रसिकाने

> जीवनाध्वरिं पडे आज पूर्णाहुती,
> येइ अन्त्येष्टिघटि, आज झालों कृती ॥
>
> कर्मभूमीवरी अवतरुनि जीं करीं
> सकल कर्मे हवी आज होवोत तीं. १
>
> कोणि आणूं नका आसवें लोचनीं,
> छे ! न ही शून्यता! पूर्णता, सद्गती ! २
>
> आज वीणेवरी भागवती शारदा
> साममंत्रावली स्वैर आलापु तीं ३
>
> आज षड्दर्शनें मूर्त येवोनिया
> वेदघोपें भरून सवनभूमीप्रती ! ४
>
> शंखघंटादिकीं नाद घुमवा अतां,
> चौघडा द्या झडूं या करा आरती ५
>
> आज पुष्पांजली स्थंडिलीं अर्पुनी
> स्वस्तिवचनीं करा सांगतासिद्धि ती ६

ही तांब्यांचीच 'पूर्णाहुति' कविता म्हटली. आम्ही तांब्याच्या आत्म्याला तिलांजलि देऊन परत निघालो. भास्कररावांच्या मृत्युस्थानावर एक पणती मिणमिणत होती. त्या पणतीची शांत ज्योत पाहून बाहेर आलो, चालूं लागलो परंतु मन मात्र अद्यपहि त्या पणतीभोवतींच घोटाळत होतें !

प्रा. जोगकृत तांबे-काव्य प्रशस्ति (?)

लेखक : पां. ब. गाडगीळ

जयंति ते सुकृतिनो रससिद्धा : कवीश्वरा
नास्ति येषां यशःकाये जरामरणजं भयम् ॥

पुणें येथील व्हीनस बुक-स्टॉल या सुप्रसिद्ध प्रकाशन संस्थेनें राजकवि भास्कर रामचंद्र तांबे यांच्या कवितेची चौथी आवृत्ति गेल्याच सालीं प्रसिद्ध केलेली आहे. तांबे यांच्या या काव्यसंग्रहाला मराठींतील एक नाणावलेले टीकाकार, 'अर्वाचीन मराठी-काव्य' 'केशवसुत' सौंदर्यशोध व आनंदबोध' 'अभिनव काव्य प्रकाश' इत्यादि ग्रंथांचे कर्ते प्रा. रा. श्री. जोग यांनी 'मधुघटांतील मधु' या शीर्षकाची चोवीस पानी विस्तृत प्रस्तावना लिहिलेली आहे. या प्रस्तावनेसंबंधींच आम्हीं आमचे विचार आज 'युगवाणीच्या वाचकांसमोर मांडणार आहोत. खरें पाहिलें असतां तांबे यांच्या सरसरमणीय काव्याला प्रस्तावनेची गरज नाहीं. तांबे यांच्या कवितेची कोणींहि 'पाठराखण' करण्याचें कारण नाहीं कारण त्या रससिद्ध कवीची कविता रसिकमान्य झालेली आहे. कदाचित् विद्यार्थ्यांच्या सोयीसाठीं प्रकाशकांनीं ही प्रस्तावना घेतली असावी. तांबे यांच्या काव्याचें समीक्षण व मार्गदर्शन व्हावें म्हणून व्हीनस प्रकाशनाच्या चालकांनीं प्रा. जोगांची प्रस्तावना या संग्रहाला जोडली असावी. आजकाल आपण पाहतों कीं प्रकाशक एखाद्या सन्मान्य साहित्यशौंडाला अगर एखाद्या प्रथितकीर्ति प्राध्यापकाला गांठून, त्याकडून प्रस्तावना लिहून घेतात. ग्रंथांतील मर्म ओळखणारा ग्रंथकर्त्याचा समानधर्मा लेखकच प्रस्तावनाकार असावा हें प्रकाशकांच्या लक्षांत येत नाहीं. तांबे यांच्या काव्याचें रसोद्ग्राही समीक्षण करण्यास, सौंदर्यान्वेषांचें मार्मिक निवेदन करण्यास व त्यांच्या काव्यांतील सौन्दर्याचें दर्शन घडविण्यास प्रा. श्री. के. क्षीरसागर यांच्यासारखा रसज्ञ टीकाकारच पाहिजे. मराठी विषयांचा कोणताहि प्राध्यापक हें कार्य करूं शकेल असें समजणें चुकीचें होईल. प्रा. जोगांच्या या प्रस्तावनेमुळें विद्यार्थ्यांची दिशाभूल होणार, त्यांची काव्यविषयक मतें विपरीत बनणार आणि हे मराठी विषयाचे अर्धकच्चे पावकच्चे विद्यार्थीच भावी पिढीचे लेखक होणार असल्यामुळें त्यांची काव्यविषयक मतें चुकीची ठरणार. प्रा. जोगांनीं लिहिलेल्या या प्रस्तावनेमुळें मराठी वाङ्मयाच्या जिज्ञासु वाचकांचीहि फसगत होणार आहे व म्हणूनच या प्रस्तावनेंतील अज्ञानजन्य विधानांचा व क्वचित् ठिकाणीं प्रस्तावनाकारांनीं केलेल्या खोडसाळपणाचा आम्हीं परामर्श घेणार आहोत.

या प्रस्तावनेची सुरुवातच पहा—"आधुनिक कवींत तांब्यांइतका भाग्यवान कवि दुसरा कोणींहि झाला नाहीं. लहानपणीं सहजगत्या रचिलेल्या काव्यपंक्तींवरून त्यांच्या अंगीं असलेला कविप्रतिभेचा स्फुल्लिंग ओळखून, तो फुलवून त्याचें संवर्धन करणारा गुरु त्यांना लाभला. गुरूनें शिष्याच्या कवित्वासंबंधाने दाखविलेली आस्था स्वतः शिष्यानें मात्र स्वतःच्या काव्यरचनेबाबत बाळगिली नाहीं—त्या कवितांचे

अनुक्रमणिका

मोठया साक्षेपानें संकलन करून त्या प्रकाशित करणारा एक भक्त व तोहि स्वतः कवि असणारा, त्यांना मिळाला---कविप्रतिभेचा पुरापुरा उन्मेष होण्याच्या आधींच दत्त कवि गेले, उन्मेष होऊनहि तिला स्थिर पक्वता येण्याच्या आधीच गोविंदाग्रज व बालकवि दिवंगत झाले, अशी पक्वता येऊनहि तिचीं फळें पूर्णपणें हातीं लागण्यापूर्वीच केशवसुत आणि माधव ज्यूलियन् यांस काळानें ओढून नेलें." या विधानांवर भाष्य करण्यापूर्वी जोग यांच्याच चालीवर केशवसुतांसंबंधी आम्हीं लिहून दाखवतो म्हणजे जोग यांच्या विधानांतील खोडसाळपणा सिद्ध होईल---आधुनिक कवींत केशवसुतांसारखा भाग्यवान कवि दुसरा कोणीहि झाला नाहीं त्यांच्या अंगीं असलेला कविप्रतिभेचा स्फुल्लिंग ओळखून तो फुलवून, प्रोत्साहन देणारा एक स्नेही आणि तोहि स्वतः श्रेष्ट कवि असलेला (रे. ना. वा. टिळक) त्यांना मिळाला, त्यांच्या कवितांचे रसग्रहण करणारा कै. प्रि. वा. ब. पटवर्धन यांच्यासारखा भक्त व तोहि स्वतः एक कवि असणारा ('वसंत' या टोपण नांवाखाली प्रि. पटवर्धन कविता लिहीत असत) त्यांना लाभला, त्यांच्या कविता मोठया साक्षेपानें प्रसिद्ध करणारा हरिभाऊ आपटे यांच्यासारखा प्रकाशक प्रथम लाभला. नंतर स्वतः प्रसिद्ध असलेला सी. के. दामले यांच्यासारखा प्रेमळ कनिष्ट बंधु त्यांच्या कवितांचा प्रकाशक बनला. कवि म्हणून केशवसुतांच्या भाग्याला येथून सुरुवात झाली. आचार्य जावडेकरांना तर त्यांच्या काव्यांत 'क्रांतिरस' आढळला, आचार्य भागवत तर केशवसुतांच्या काव्याचे परमभक्त बनलेले आहेत, मराठींतील सारे सन्मान्य कवि व टीकाकार त्यांना 'युगप्रवर्तक' कवि मानतात आणि त्यांच्या काव्याचा गौरव अप्रतिहत चालू आहे व म्हणून आधुनिक कवींत केशवसुतांसारखा भाग्यवान कवि दुसरा कोणीहि झाला नाही.---असेंच माधव ज्यूलियन यांच्यासंबंधी लिहितां येईल. केशवसुत भाग्यवान कीं, तांबे भाग्यवान कीं, माधव ज्यूलियन् भाग्यवान ? कोण अभागी व कोण भाग्यवान हें कसें ठरवायचें ? जोग पुढें म्हणतात--

"कवीची षष्टयब्दि साजरी होण्याचे प्रसंग महाराष्ट्रांत तरी विरलच होत, पण तांब्यांच्या बाबतींत ती साजरी झाली व आपला गौरव त्यांना आपल्या डोळयांनी पाहावयास मिळाला." आता षष्टयब्दि होणें भाग्याचें कीं, देहावसानानंतर स्मारक होणें भाग्याचें हा प्रश्न उभा राहतो. माधव ज्यूलियन् हे तांब्यांपेक्षां जास्त भाग्यवान कारण षष्टयब्दि झाली नाही तरी त्यांच्या नांवाचा स्मारक--हॉल उभारला गेला आहे. तांब्यांचें कांहींतरी स्मारक आज शिल्लक आहे काय ? तांबे यांच्या मृत्युयात्रेचें श्रीपाद डोंगरे यांनी केलेलें वर्णन वाचल्यास तांबे भाग्यवान होते कीं अभागी होते तें वाचकांस कळेल. कवीच्या नांवानें स्मारक हॉल-उभारल्याचें उदाहरण महाराष्ट्रांत तरी विरलच आहे, पण तेंहि भाग्य माधव ज्यूलियन् यांना लाभलें, केशवसुतांची कीर्ति मरणोत्तर झाली पण त्यांच्यावर जो जाडजूड ग्रंथ रा. श्री. जोग यांनी लिहिलेला आहे तसा (दोष पूर्ण नव्हे) तांबे यांच्यावर कोणी लिहिला आहे काय ? मग भाग्यवान कोण केशवसुत कीं तांबे ? आधुनिक कवितेचा आद्यजनक व आद्यप्रवर्तक म्हणून केशवसुतांची आद्य गुरु म्हणून पीठावर स्थापना झाली तसा मान तांबे यांना मिळाला काय ? गुरुपीठ, संप्रदाय, मोड आणि खुर्दा शिष्यगण इत्यादि गोष्टी केशवसुतांच्या वाटयाला आल्या तशा तांबे यांच्याभाळीं लिहिल्या नव्हत्या. मग तांबे भाग्यवान कसे ? जोग म्हणतात, 'एकदां मध्यभारतीय कविसंम्मेलनाचें व पुढें कोल्हापूर येथील काव्यविभागाचें अध्यक्षपद मिळून तांब्यांच्या कवियशावर शिक्कामोर्तब झाले ही गोष्टहि अनेक कवींना अनुभवावयास न मिळणारी आहे.' काव्यविभागाचें अध्यक्षपद मिळणें ही मोठी भाग्याची गोष्ट समजली असेल तर महाराष्ट्र साहित्य संमेलनाचें अध्यक्षपद मिळणें फारच मोठया भाग्याचें समजलें जाईल. जुन्याकाळीं रावसाहेब वि. मो. महाजनी व रावसाहेब ग. ज. आगाशे यांनीहि अध्यक्षपद भूषविलें आहे. अलिकडच्या काळांतील उदाहरणच ध्यावयाचें

तर तांब्यांशी तुलना करतां अगदींच सामान्य असलेल्या कवि यशवंतांना तें लाभलें. मग भाग्यवान कोण? तांबे कीं, महाराष्ट्र साहित्य संमेलनाचें अध्यक्ष झालेले कवि यशवंत? तांबे मध्यभारतीय कविसंमेलनाचे अध्यक्ष झालेले होते. प्रांतिक संमेलनांचे अनेक साहित्यिक अध्यक्ष झाले आहेत. जोग यांना या खोडसाळ लिखाणांतून असें सुचवावयाचें आहे काय कीं, तांबे यांची लायकी नसतांना त्यांना हे सन्मान प्राप्त झाले? तसें म्हणण्याचें धाडस असेल तर जोगांनीं स्पष्टपणें लिहावें, त्याला उत्तर देण्यास टीकाकार समर्थ आहेत. तांब्यांच्या दीर्घायुष्यावर जोगांचा मोठा कटाक्ष दिसतो. ते म्हणतात, "कांही कालापर्यंत काळ तांब्यांच्या समोर येऊन उभा ठाकला होता, पण तो परत गेला व तांब्यांच्या प्रतिभेच्या विलासाला त्यानें पूर्णपणें वाव दिला." तांबे दीर्घायुषी ठरले व म्हणून त्यांच्या प्रतिभाविलासाला भरपूर 'वाव' मिळाला. इतर कवि विचारे अल्पवयांतच मृत्युमुखीं पडले व म्हणून त्यांच्या प्रतिभेच्या विलासाला वाव मिळाला नाहीं. केशवसुत लवकरच दिवंगत झाले. माधव ज्यूलियन् यांस काळानें ओढून नेले व म्हणून 'पक्वतेचीं फळें त्यांच्या हातीं आलीं नाहींत.' जोग यांना काय म्हणावयाचें आहे? त्यांना असें सुचवावयाचें आहे काय कीं, केशवसुत, गोविंदाग्रज, बालकवि, माधव ज्यूलियन् हें दीर्घायुषी ठरले असते तर त्यांची कविता जास्त गुणवान ठरली असती कीं, त्यांना असें सुचवावयाचें आहे कीं, केवळ पुष्कळ वर्षे लिहिण्यास मिळालीं म्हणून तांब्यांची कविता थोडी फार मान्यता पावण्याइतकी सरस ठरली? जोगांची टीकेची पद्धतच मोठी अजब दिसते. कवि दीर्घायुषी ठरला तर त्याच्या प्रतिभेला पूर्ण वाव मिळाला असें दूषणास्पद लिहावयाचें व तो अल्पायुषी ठरला तर 'पक्वता येऊनहि तिचीं फळें पूर्णपणें हातीं लागण्यापूर्वी' तो दिवंगत झाला अशी मखलाशी करावयाची. शेले अल्पवयांतच वारला व वर्डस्वर्थ व टेनिसन वरीच वर्षे जगले व म्हणून जर कोणी वर्डस्वर्थच्या व टेनिसन्च्या काव्याचा-शेलेचा संदर्भ देऊन—अधिक्षेप करेल तर त्याला काव्यमर्मज्ञ काय म्हणतील? शेले अल्पायुषी ठरला तरी त्याच्या प्रतिभेचें उड्डाण पाहूनच त्याला थोर कवि मानण्यांत आले. खरें पाहिले असतां कविप्रतिभेच्या आणि स्फूर्तीच्या पहिल्याच बहरांत कवि जे लिहितो तेंच उत्कृष्ट ठरत आलें आहे. कवि किती उंच गेला याच्यावरच त्याच्या काव्याचें मोल ठरत असते. तो सरपटला किती, त्यानें विपुल काव्यरचना केली अथवा नाही यांवर त्याच्या गुणांचें मूल्यमापन ठरत नसते. केशवसुतांच्या काव्यासंबंधी असेंच म्हणतां येईल. केशवसुत जास्त जगले असते तरी त्यांनी उत्कृष्ट रचना केलीच असती असे कांही सांगतां येत नाहीं. माधव ज्यूलियन् जास्त जगले असते तर त्यांनी 'विरह तरंगा' सारखें दुसरें काव्य लिहिलें असते कीं, 'सुधारका' प्रमाणें लिहिलें असते याची खात्री देतां येत नाही (नकुलांकार वाचून तर दुसराच ग्रह बळावतो) गोविंदाग्रज कदाचित् कूटरचना व कृत्रिम भावंचे खेळ करीत बसले असते. तेव्हां आयुर्मर्यादेचा प्रश्न काव्यसमीक्षेंत उपस्थित करणें खोडसाळपणाचें आहे. जोगांनी पुढें काय लिहिलें आहे तें पहा—'प्रेमाच्या बाबतींत निराशा पदरी न येतां समाधानाचाच अनुभव तांब्यांना आला ही गोष्ट अल्प भाग्याची म्हणतां येईल काय?' माधव ज्यूलियन् यांचा प्रेमभंग झाला होता. केशवसुतांचें पत्नीवर प्रेम नव्हते, विनायक तर बोलून-चालून छंदीफंदी या सगळ्यांशी तुलना करितां तांबे भाग्यवान तर खरेंच पण या भाग्याचें वर्णन करण्यांत जोगांची काय मखलाशी आहे? प्रेमभंग न होणें येवढेंच भाग्य मानावयाचें असल्यास मराठींतील अनेक कवींना हें भाग्य लाभलें आहे. विवाहोत्तर प्रेम हेंच बहुतेकांच्या वांट्याला आलें असल्यामुळें ती कांही मोठी भाग्याची गोष्ट मानतां येत नाही. तांबे चंगीभंगी नव्हते, प्रेमळ कौटुंबिक वृत्तीचे गृहस्थ होते. प्रेमनिराशा झालेल्या महाराष्ट्रांतील कोणच्याहि कवीपेक्षां 'प्रेमा'चें महात्म्य त्यांना जास्त कळत होते. 'प्रणयपंढरीच्या वारकऱ्यां'पेक्षां त्यांची प्रेमपर कविता जास्त सखोल आहे. त्यांना

अनुक्रमणिका

राजकविपद मिळालें व म्हणून 'जीवनाध्वरांत पूर्णाहुति' देण्याची वेळ येतांच आपण 'कृती' असल्याची भावना तांब्यांना झाली असें जोग म्हणतात. राजकविपद यशवंतांनाहि मिळालेलें आहे. चंद्रशेखरांनाहि मिळालें होते. मग अधिक भाग्यवान कोण ? यशवंत तांब्यांइतकेच भाग्यवान किंबहुना अधिक भाग्यवान कारण! तांब्यांच्या तुलनेनें त्यांची कविता सामान्य आहे. तिला राजमान्यता मिळाली हें यशवंतांचेंच भाग्य !

ज्याला अल्पवयांतच शिक्षण सोडून नोकरीस जुंपावे लागलें, चांगले दिवस आल्यानंतर ज्याची माता निधन पावली, पुत्रनिधनाचें दुःख ज्याला भोगावे लागलें, जांवयाचा मृत्यु झाला आणि अनेक नातलगांचे मृत्यु पाहावे लागले, अशा गृहस्थास 'कृती' असल्याची भावना झाली ती लौकिक परिस्थितींतील यशामुळें नाही तर अंतर्यामीच्या समाधानी वृत्तीमुळें, त्यांच्या ठिकाणीं असलेल्या दुर्दम्य आशावादामुळें व आस्तिक्य बुद्धीमुळें तें निराशावादी बनले नाहीत. त्यांना जो लौकिक प्राप्त झाला तो त्यांच्या गुणवत्तेच्या मानानें फारच कमी होता. ज्या महाराष्ट्रांत रविकिरण मंडळाचें सामान्य काव्य लोकप्रिय झालें, जेथें कमअस्सल कवींचे ढोल बडविले गेले त्या महाराष्ट्रांत तांबे आणि बी यांच्या काव्याला किती उशिरां मान्यता मिळाली हें पाहणें मनोरंजक आहे. काव्यविभागाचें अध्यक्षपद तांबे यांना केव्हां मिळालें हेंहि लक्षांत घेतलें पाहिजे. या गोष्टींवरून तांबे हे अधिक भाग्यवान ठरतात काय ? मग जोगांनी असलीं खोडसाळ विधानें कां करावींत ? तांबे यांच्या काव्याचें समीक्षण करतांना या फालतू गोष्टींची चर्चा करण्याचें कांहीच कारण नाही.

उद्यां समजा एखाद्यानें म्हटलें कीं, प्रा. रा. श्री. जोग यांच्या सारखा भाग्यवान टीकाकार दुसरा कोणीही झाला नाही व असें लिहिलें कीं, "ज्याच्या 'अभिनव काव्य प्रकाश' 'केशवसुत' 'सौंदर्यशोध व आनंदबोध' या ग्रंथांचे हजारों विद्यार्थ्यांकडून वाचन होते. ज्यानें अनेक ग्रंथांना प्रस्तावना लिहिल्या. ज्याला प्राध्यापकाची मानाची जागा मिळाली. ज्याच्या 'ज्योत्स्ना गीत' व 'निशागीत' या काव्यसंग्रहांना प्रकाशक लाभला व ज्याच्या 'प्रतिभेच्या विलासाला काळानें पूर्ण वाव दिला' आहे त्या जागांशिवाय दुसरा कोणीहि भाग्यवान टीकाकार महाराष्ट्रांत झालेला नाही" तर जोगांना व त्यांच्या भक्तांना काय वाटेल ?

दुसऱ्या परिच्छेदांत मात्र जोगांना तांब्यांच्या यशांत केवळ भाग्याचाच भाग होता असें समजणें चुकीचें होईल असें विधान केलें आहे. त्यांची काव्यनिष्ठा व गुणसंपदा यांचाच भरीव आधार त्यांच्या यशाचा भाग होता असें मान्य केल्यावर पहिल्या परिच्छेदांतील खोडसाळ विधानांना काय अर्थ राहतो ? तांबे यांनी कोणच्या वर्षी किती कविता लिहिल्या याची मीमांसा करून जोग म्हणतात कीं, १९२० अखेर माधवरावांनी त्यांचा संग्रह प्रसिद्ध केला. आपल्या कवितेस एक रसिक मिळाला असून संग्रहरूपानें तो आपली कविता इतर रसिकांपुढें ठेवणार या कल्पनेनें प्रोत्साहन मिळून त्यांच्याकडून बरीच काव्यरचना झाली असणें अगदीं शक्य आहे.

काव्य हा भावनांचा सहजोद्गार असतो हें वचन आपल्या कानांवरून गेलेलें नाही काय ? तांबे अभिजात कवि होते. काव्य लिहावयाचें ठरवून ते काव्यरचना करीत नसत. रविकिरण मंडळाच्या कवींप्रमाणें त्यांनी आपल्या काव्यरचनेचें 'नियोजन' केलें नव्हते. केवळ संग्रह प्रसिद्ध होणार या कल्पनेनें प्रोत्साहन मिळून काव्यरचना होत नसते. जोगांचे दोन काव्यसंग्रह प्रसिद्ध झालेले आहेत. १९२६ व १९२८ सालीं हे संग्रह प्रसिद्ध झाले.

(अपूर्ण)

संघवार्ता

ना. रा. शेंडे
सरचिटणीस, वि. सा. संघ,
यांजकडून–

कार्यकारी मंडळाची सभा

वि. सा. संघाच्या कार्यकारी मंडळाची सभा रविवार दि. ३१–१०–१९५४ रोजीं सकाळीं ८–३० वा. संघाध्यक्ष श्री. ह. ना. नेने यांचे अध्यक्षतेखालीं केन्द्रीय कार्यालयांत भरली.

१. प्रथम सरचिटणिसांनी दि. १८–७–१९५४ रोजीं भरलेल्या कार्यकारी मंडळाच्या सभेचा अहवाल वाचून दाखविला व तो मंजूर झाला.

२. नंतर सरचिटणिसांनी मागील सहा महिन्यांत म्हणजे १ एप्रिल ते सप्टेंबर १९५४ पर्यंत झालेल्या कार्याचा आढावा सभेला सादर केला. तसेंच सहामाही जमा–खर्च आणि १९५०–५१ ते १९५३–५४ पर्यंतचें बॅलेन्स–शीट सभेला सादर केलें. त्यानंतर अध्यक्षांनी १९५५–५६ सालच्या निवडणुकीसंबंधीं नियोजित केलेल्या तारखा सभेला सादर केल्या.

३. वि. सा. संघाच्या संमेलनासंबंधीचा प्रश्न विचारांत घेण्यांत आला. त्याबाबत अचलपूरचे श्री. श्री. शां. गुप्ते यांचें पत्र सभेला वाचून दाखविण्यांत आलें. त्यावर विचार करण्यांत येऊन, शक्यतोंवर अचलपूरलाच संमेलन घेण्यांत यावें व तेथें संमेलन घेणें शक्य न झाल्यास दुसरीकडे तें घडवून आणावें, असा निर्णय घेण्यांत आला. हा प्रश्न श्री. पु. य. देशपांडे, श्री. पुरुषोत्तम दिवाकर ढवळे, प्रा. सौ. कुसुमावतीबाई देशपांडे, श्री. व. वा. शद्धे व आमंत्रक श्री. ना. रा. शेंडे यांनी सोडविण्याचा प्रयत्न करावा, असें ठरलें.

४. श्री. नानासाहेब जोग, कार्यवाह, मंदिररचना समिति यांचें त्यांच्या ताब्यांत असलेल्या नोकरांसंबंधीचें निवेदन सभेला सादर करण्यांत आलें. त्यावर विचार होऊन, संघाध्यक्ष श्री. ह. ना. नेने, मंदिररचना समितीचे अध्यक्ष न्या. मू. के. तु. मंगळमूर्ति, सरचिटणीस श्री. ना. रा. शेंडे, मंदिररचना समितीचे कार्यवाह श्री. नानासाहेब जोग, प्रा. सौ. कुसुमावतीबाई देशपांडे व श्री. केशव केळकर यांनी हा प्रश्न निकालांत काढावा, असें ठरलें.

५. इमारतीसाठी ५०,००० रु. च्या नवीन सरकारी ग्रँटसंबंधीच्या पत्राचा विचार करण्यांत आला.

६. भाषाविषयक संशोधनासंबंधींचें अध्यक्षांनी निवेदन केलें. संशोधकांना आर्थिक मदत करण्याच्या बाबतींत भाषाविषयक संशोधन समितीने काय तें ठरवून आपला निर्णय कार्यकारी मंडळाला सादर करावा, असें ठरलें.

७. नंतर, ग्रंथ–संग्रहालयाचा संबंधीचा प्रश्न सभेपुढे आला. श्री. गो. स. सरदेसाई, पो. कामशेत जि. पुणें यांचें दि. २९ ९–५४ चें म. म. प्रि. वा. वि. मिराशी यांना आलेलें व त्यांनी संघाध्यक्षांना विचारार्थ दिलेलें पत्र सभेला वाचून दाखविण्यांत आलें. श्री. गो. स. सरदेसाई यांचा ग्रंथ – संग्रह अतिशय मोलाचा असल्याने तो वि. सा. संघासाठी हस्तगत करण्याचा यशस्वी प्रयत्न अध्यक्षांनी करावा, असा निर्णय घेण्यांत आला.

८. वि. सा. संघाचे दोन सभासद श्री. भाऊराव भोयर व श्री. म. ज. गद्रे यांनी दि. २१-१०-५४ रोजीं पत्रासह पाठविलेल्या घटना–दुरुस्तीवर विचार करण्यांत आला. खास निमंत्रणाने उपस्थित असलेले

अनुक्रमणिका

घटनाविषयक प्रश्न समितीचे अध्यक्ष रा. सा. खं. के. रांगोळे यांनी घटनादुरुस्तीबाबत खुलासा केला. या दुरुस्त्या नियमांच्या स्पष्टीकरणाबाबत असल्याने कार्यकारी मंडळाला या दुरुस्त्यांची आवश्यकता आहे, असें ठरून, या बाबतींत अध्यक्षांनीं तारीख निश्चित करावी व सर्वसाधारण सभा बोलवावी असा निर्णय घेण्यांत आला.

९. 'हिंदी मराठी भाषा प्रवेशिका' या पुस्तकाच्या किंमतीचा प्रश्न विचारांत घेण्यांत येऊन, या पुस्तकाची किंमत १ रु. ४ आणे ऐवजी सवलतीची किंमत म्हणून १२ आणे ठेवावी व तसें जाहीर करावें, असा निर्णय घेण्यांत आला.

१०. नाट्य महोत्सवासंबंधीचा प्रश्न चर्चिला जाऊन, या बाबतचें निवेदन नाट्य समितीने कार्यकारी मंडळाला सादर करावें व मग निर्णय घेण्यांत यावा, असें ठरलें.

अध्यक्षांच्या परवानगीनें आलेले विषयः

११. प्रा. वा. कृ. चोरघडे यांच्या दि. २७–१०–५४ च्या पत्राचा विचार करण्यांत येऊन, जुनी आगरकर ग्रंथ–लेखन समिति विसर्जित करण्यांत आली आणि खालील **नवीन आगरकर ग्रंथ-लेखन समिति** नियुक्त करण्यांत आली:

सभासद : (१) श्री. पुरुषोत्तम दिवाकर ढवळे, (२) प्रा. पां. कृ. सावळापूरकर, (३) प्रा. डॉ. वि. भि. कोलते, (४) प्रा. भ. श्री. पंडित, (५) डॉ. य. खु. देशपांडे व (६) आमंत्रक– **श्री.** ल. वि. पांढरीपांडे.

अधिक सभासद स्वीकृत करण्याचा अधिकार या समितीस देण्यांत आला. कार्यकारी मंडळाच्या निर्णयानुसार प्रा. वा. कृ. चोरघडे यांना तसें पत्र पाठविण्याचें ठरलें.

१२. श्री वसंत चुके, सहचिटणीस, वि. सा. संघ, अमरावती शाखा यांचें दि. १४-१०-५४ चें अमरावती शाखेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व कोषाध्यक्ष यांनी दिलेले राजीनामे स्वीकृत झाल्या संबंधीच्या ठरावा-सह आलेलें पत्र सभेच्या विचारार्थ ठेवण्यांत आलें. त्यावर विचार झाला. प्रा. भ. श्री. पंडित यांनीं याबाबत ते त्या बैठकीला हजर असल्याने माहिती सांगितली. त्यानंतर, श्री. वसंत बाळाजी शब्दे यांनी खालील ठराव मांडला व त्यास श्री. पुरुषोत्तम दिवाकर ढवळे यांनी अनुमोदन दिलें.

ठराव "श्री. वसंत चुके, सहचिटणीस, अमरावती वि. सा. संघ शाखा यांच्या दि. १४-१०-५४ च्या पत्राचा व प्रा. भ. श्री. पंडित यांच्या शाखेसंबंधीच्या निवेदनाचा विचार झाला. वि. सा. संघाच्या कार्यकारी मंडळाची सभा असा ठराव करते की, अमरावती शाखेचें चालू कार्यकारी मंडळ तावडतोड विसर्जित करण्यांत येत आहे. अमरावती शाखेचें नवीन कार्यकारी मंडळ निवडण्यांत यावें. ही निवडणूक घडवून आण-ण्याचे सर्व अधिकार प्रा. भ. श्री. पंडित यांना ह्या ठरावान्वयें देण्यांत येत आहेत. ह्या निवडणुकीसाठीं अमरावती नगरांतील १५ ऑक्टोबर १९५४ पर्यंत केंद्रीय कार्यालयांत ज्या सभासदांची अधिकृत नोंद झालेली असेल तेच अमरावती शाखेचे ह्या निवडणुकीपुरतें मतदार सभासद समजण्यांत येतील. ही निवडणूक आज तारखेपासून ३ महिन्याच्या आंत घडवून आणण्याचा आदेश प्रा. पंडित यांना देण्यांत येत आहे.

अमरावती शाखेचें सर्व दप्तर, सर्व कागदपत्र पत्रव्यवहारासहीत गोळा करून श्री. चुके यांनी प्रा. भ. श्री. पंडित यांच्या स्वाधीन करावेत. या ठरावाप्रमाणे अमरावती शाखेच्या कार्यकारी मंडळाची निवडणूक घडवून आणून, प्रा. भ. श्री. पंडित यांनी वि. सा. संघाच्या कार्यकारी मंडळास सबंध कार्यवाहीचें प्रतिवृत्त सादर करावें.

इतर सभासदांनी प्रा. भ. श्री. पंडित यांना त्यांच्यावर सोपविलेल्या कार्यांत पूर्ण सहकार्य व मदत द्यावी, अशी सर्वांना विनंती आहे."

वरील ठराव एकमताने मंजूर झाला.

१३. प्रा. पां. कृ. सावळापूरकर, संचालक, परीक्षा समिति, यांनी दि. २५-४-५४ रोजीं भरलेल्या वार्षिक साधारण सभेंत ठरल्याप्रमाणें आतापर्यंत परीक्षा-शुल्क २५०० रु. जमा झाल्याने कार्यकारी मंडळाने या समितीच्या खर्चात १००० रु. ची वाढ करावी असें सुचविलें. तसा अधिकार साधारण सभेने कार्यकारी मंडळाला दिला असल्याने प्रा. सावळापूरकर यांची मागणी मंजूर करण्यांत आली.

नंतर, प्रा. सावळापूरकर यांनी परीक्षा केन्द्राधिकाऱ्यांकडे 'युगवाणी' पाठवावी अशी मागणी केली. श्री. व. वा. शद्दे यांनी जे केन्द्राधिकारी वि सा. संघाचे सभासद नसतील त्यांनाच 'युगवाणी' पाठवावी अशी सूचना केली. श्री. शद्दे यांची सूचना मान्य झाल्यावर ही सभा संपली.

* *

वि. सा. संघाचें अध्यक्षपद : नागपूर हायकोर्टाचा निर्णय

श्री. ह. ना. नेने यांची निवड कायम

श्री. शंकर नारायण सहस्त्रबुद्धे यांनी विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष श्री. ह. ना. नेने यांच्या अध्यक्षीय निवडणुकी विरुद्ध आक्षेप घेऊन 'लेटर्स पेटंट' अन्वयें नागपूर हायकोर्टाचे डिव्हिजन बेंचकडे अपील केलें होतें. या डिव्हिजन बेंचाचे न्यायमूर्ति श्री. कौशलेन्द्रराव आणि न्यायमूर्ति श्री. तांबे यांनी तें अपील दि. १०-११-१९५४ रोजीं फेटाळून लावलें.

या कामीं वि. सा. संघातर्फे अॅड. ई. जे. मोहरीर व अॅड. डी. बी. नाजबिले यांनी परिश्रमपूर्वक काम चालविलें. वि. सा. संघ त्यांचा फार आभारी आहे.

वि. सा. मंदिरनिधि समितीची सभा

मंदिरनिधि समितीची सभा रविवार दि. १४-११-५४ रोजीं न्या. मू. के. तु. मंगळमूर्ति यांच्या अध्यक्षतेखाली भरून आतापर्यंत झालेलें आणि पुढे करावयाचें काम यासंबंधी निर्णय घेण्यांत आले. श्री. नानासाहेब जोग आणि श्री. य. शं. धर्माधिकारी यांना मंदिरनिधि समितीवर स्वीकृत सदस्य करून घेण्यांत आले. श्री. य. शं. धर्माधिकारी यांची सर्वानुमतें या समितीचे आमंत्रक म्हणून निवड करण्यांत आली.

* *

वि. सा. संघाचें पुढील संमेलन अचलपूर येथे भरणार

वि. सा. संघाचें पुढील संमेलन, अधिवेशन १७ वें अचलपूर (परतवाडा) येथील सार्वजनिक वाचनालयातर्फे भरणार असून, अधिवेशनाची पूर्व तयारी उत्साहाने सुरू आहे.

* *

वि. सा. संघाला उदार देणगी

युनायटेड स्टेट्स इन्फर्मेशन सर्व्हिस, मुंबई यांचेकडून वि. सा. संघाला शंभर वाचनीय पुस्तकांची देणगी देण्यांत आली आहे.

तसेंच, श्री. भा. द. भावे, नागपूर यांनी आपले वडील कै. दत्तात्रय त्रिंबक भावे यांचे पुण्यस्मरणार्थ वि. सा. संघाला श्री. व्यं. केतकर यांच्या 'महाराष्ट्रीय ज्ञानकोशा'चे मौलिक असे एकूण तेवीस भाग भेट म्हणून दिले.

वि. सा. संघ या देणगीदारांचा फार आभारी आहे.

अनुक्रमणिका

भंडाराशाखा वृत्त

वि. सा. संघ भंडाराशाखा व तेथील सार्वजनिक वाचनालय यांच्या विद्यमानें दि. २७-१०-५४ रोजीं सरस्वती – पूजनाचा सुंदर कार्यक्रम झाला. या प्रसंगीं बनारस विद्यापीठाचे वाचनालय प्रमुख श्री. ना. म. केतकर यांचें विचारपरिलुप्त भाषण झालें. शाखेचे चिटणीस श्री. व. बा. शद्धे प्रभृतींचा प्रयत्न स्तुत्य आहे.

★ ★

गोंदियाशाखा वृत्त

गोंदियाशाखेच्या वि. सा. संघाची स्वाध्याय समिति व मित्रमंडळ यांची संयुक्त कोजागिरी मंगळवार दि. १२-१०-५४ रोजीं येथील सेलसटॅक्स इन्स्पेक्टर श्री. डगांवकर यांच्या निवासस्थानीं प्रसन्नपूर्ण वातावरणांत साजरी झाली.

या प्रसंगीं आयोजित केलेल्या संगीत सभेंत कु. विजया टेंभेकर, कु. प्रमिला लुले, सौ. कुमुदताई दामले, श्री पंचभाई, श्री. आमटे, श्री. काटे प्रभृति स्थानिक कलाकारांनीं भाग घेऊन, आपल्या कलानैपुण्याची उत्कृष्ट चमक दाखविली. श्री. आमटे यांनी तर हृदयाला स्पर्श करणारी डफावर थाप देऊन, नरवीर तानाजींचें मूर्तिमंत ऐतिहासिक स्मृतिचित्र उभे करून श्रोत्यांना चकित केलें. सर्वच कलाकारांनी विविध भावरंग उधळून कोजागिरीचें चांदणें फुलविलें.

दुग्धपानाच्या मधुर कार्यक्रमानंतर, श्री. काटे यांचें समयोचित भाषण झालें. मित्रमंडळाचे कार्यवाह श्री टेंभेकर यांनीं अभ्यागतांचा परिचय करून दिल्यावर, स्वाध्याय समितीचे उत्साही कार्यवाह श्री. वासुदेवराव दिवाकर यांनी उपस्थितांचे व कलावंतांचे मनःपूर्वक आभार मानले आणि मग हा आकर्षक कार्यक्रम संपला. गोंदियाशाखेचे चिटणीस श्री. ना. ग. डबीर प्रभृतींचें कार्य प्रसंशनीय आहे.

★ ★

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघ

विशेष-साधारण सभेची सूचना

रविवार दि. ३१–१०–१९५४ रोजीं भरलेल्या कार्यकारी मंडळाच्या सभेने दिलेल्या आदेशानुसार खालील घटनेंत बदल करण्यासंबंधी विचार करण्यासाठी नियम १० व २२ अनुसार विशेष–साधारण सभा रविवार दि. १६ जानेवारी १९५५ रोजीं सायंकाळीं ४ वा केन्द्रीय कार्यालयांत भरेल.

सर्व सभासदांनी या सभेला अवश्य उपस्थित रहावें, ही विनंती.

दि. २५–११–१९५४
केंद्रीय कार्यालय,
उत्तर अंबाझरी रस्ता,
नागपूर, १

पुरुषोत्तम दिवाकर ढवळे
उपाध्यक्ष
विदर्भ साहित्य संघ

विशेष सूचना : गणपूर्तीच्या अभावीं ही विशेष–साधारण सभा स्थगित झाल्यास तीच सभा त्याच दिवशीं त्याच जागीं सायंकाळीं ४–३० वा. भरेल.

पुरुषोत्तम दिवाकर ढवळे
दि. २५–११–१९५४ उपाध्यक्ष, वि. सा. संघ.

सभेपुढे विचारार्थ असलेले ठराव

ठराव १– नियम १२ नंतर खालील नियम नवीन घालण्यांत यावे :–

१२– अ. (क) नियम १२ मध्ये उल्लेखिलेल्या अध्यक्ष व कार्यकारी–मंडळ यांच्या निवडणुकी ह्या वेगवेगळया निवडणुकी समजण्यांत येतील.

(ख) कोणाहि उमेदवारास आपली उमेदवारी परत घ्यावयाची असल्यास नियम १२ (उ) प्रमाणे नामनिर्देश प्रत्रिकांची छाननी होऊन यादी निश्चित करण्यांत आल्यानंतर दोन दिवसांचे आंत त्याने पुढील नमुन्याप्रमाणे पत्र अध्यक्षांचे नांवें केंद्रीय संघकार्यालयाकडे कार्यालयाच्या कामाच्या वेळांत पाठविलें पाहिजे :–

" मी अध्यक्षपदाकरिता / कार्यकारी–मंडळाच्या सभासदत्वाकरिता उमेदवार म्हणून दिलेलें नांव परत घेतो.

ता. सही——————

(ग) वरील पोट नियम (ख) प्रमाणे पत्र पाठवून उमेदवारी परत घेण्यांत आल्यावर ही मागणी परत घेण्याचा अधिकार उमेदवारास रहाणार नाही.

(घ) उमेदवारी परत घेण्यासाठी असलेली दोन दिवसांची मुदत संपल्यावर निवडणुकीसाठी उभ्या असलेल्या उमेदवारांची अधिकृत यादी तयार करण्यांत आली पाहिजे.

(ङ) अधिकृत यादीप्रमाणे अध्यक्षपदासाठीं केवळ एकच उमेदवार उभा असल्यास तो निवडून आल्याचें तात्काळ जाहीर करण्यांत आले पाहिजे. तसेंच कार्यकारी सभासदांच्या भरावयाच्या जागां-इतकीच किंवा त्यांहून कमी उमेदवारांची संख्या असल्यास ते सर्व उमेदवार निवडून आल्याचें तात्काळ जाहीर करण्यांत आलें पाहिजे.

(च) मतदारांच्या यादींत नोंदलेल्या मतदारांच्या पत्त्यावर निवडणूक मतपत्रिका नियम १२ (ऊ) प्रमाणे पाठवितांना पोस्टिंग सर्टिफिकेट घेण्यांत आलें पाहिजे. असें पोस्टिंग सर्टिफिकेट हें मतपत्रिका योग्य प्रकारें पाठविल्याबद्दलचा दाखला समजण्यांत येईल व तदनंतर मतपत्रिका विलंबानें पोहोचल्याबद्दल किंवा मुळींच न पोहोचल्याबद्दल कोणताहि आक्षेप लागू राहणार नाहीं.

(छ) कोणाहि मतदाराजवळील मतपत्रिका खराब झाल्यामुळे दुसरी मतपत्रिका पाठविण्याबद्दल अध्यक्षांस विनंती, संघकार्यालयांत मतपत्रिका भरून पाठविलेल्या व ती पोहोचण्यासाठीं ठरलेल्या अंतिम तारखेपूर्वी आल्यास, खराब झालेली मतपत्रिका घेऊन नवी मतपत्रिका देण्याचा अधिकार अध्यक्षांस आहे. परंतु नवी पत्रिका भरून पाठविण्यास पुरेसा वेळ नसल्याबद्दल किंवा अशा प्रकारच्या अन्य कोणत्याहि तक्रारीने निवडणुकी संबंधांत आक्षेप घेतां येणार नाहीं.

(ज) नियमावलींत निवडणुकीं संबंधांतील ज्या बाबींबद्दल उपबंध नाहीं अशा बाबीं संबंधांतील आवश्यक तो सर्व आदेश देण्याचा अध्यक्षांस अधिकार आहे; व त्या संबंधांत कोणत्याहि प्रकारचा आक्षेप घेतां येणार नाही.

१२– आ. निवडणुकीं संबंधांत जाहीर करावयाच्या गोष्टी किंवा घोषणा ह्या केंद्रीय संघकार्यालयांतील सूचना–फलकावर योग्य सहीनिशीं लावल्याने त्यांची प्रसिद्धि नियमांनुसार झाली असें मानण्यांत येईल. इतर वृत्त–पत्रांमधून किंवा युगवाणींत प्रसिद्धी देणें हें कार्यालयाने सोय म्हणून करण्यास हरकत नाहीं. पण बाबत बंधन नाहीं.

१२–इ. निवडणुकी संबंधांत अध्यक्षांस असलेले सर्व अधिकार त्यांच्या अनुपस्थितींत उपाध्यक्षांस राहतील.'

ठराव २–वरील संशोधनें मंजूर होतांच अमलांत येतील.

ठराव ३– विदर्भ साहित्य संघाच्या कार्यकारिणीची मुदत तीन वर्षांची असावी. कार्यकारिणी व कार्याध्यक्ष यांची निवडणूक दर तीन वर्षांनी व्हावी. संमेलनाचा अध्यक्ष सालोसाल संमेलनापूर्वी निवडण्यांत यावा व तो कार्यकारिणीचा पदसिद्ध सभासद रहावा.

हा उद्देश साध्य करण्यासाठीं घटनेंत जो बदल करणें आवश्यक असेल तत्संबंधित व तदनुषंगिक उपसूचना शक्य तितक्या लवकर तयार करून पुढील विशेषसाधारण सभेपुढे विचाराकरिता मांडण्यांत यावी.

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघ, नागपूर, गडकरी--स्मारक--समिति

जाहीर विनंती.

महाराष्ट्राचे आवडते व प्रतिभासंपन्न नाटककार कै. राम गणेश गडकरी यांच्या स्मारकासंबंधीं जी योजना विदर्भ साहित्य संघाने आखली आहे, त्या योजनेपैकी स्मारक–सभागृह बांधणीचें कार्य पूर्ण झाले आहे. विदर्भ साहित्य मंदिरांतर्गत साभागृहाचेहि उद्‌घाटन राष्ट्रपति डॉ. राजेंद्रप्रसादजींच्या हस्तें दि. २७ एप्रिल १९५४ रोजीं झाल्याचे आतां माहीत झालेच आहे.

२ कै. गडकरी यांचे अखिल महाराष्ट्रांतील पहिले व एकमेव असे हे स्मारक–गृह उभारण्याचे कार्यात, कै. गडकरी यांच्या अनेक चाहत्यांनी व नाटचसंस्थांनी गडकरी–स्मारक समितीला देणगीरूपाने अमोल मदत दिली आहे. या देणगीदारांनी सहनुभूतिपूर्वक दिलेल्या सहकार्यामुळेच गडकरी समितीला योजनेपैकी प्रमुख भाग पूर्ण करतां आला. अर्थात् या सर्व देणगीदारांचे, नाटचसंस्थांचे व कार्यकर्त्यांचे, त्यांनी दिलेल्या या सक्रीय सहकार्याबद्दल जाहीर आभार मानणे समितीला आपले कर्तव्य वाटते.

३ कै. गडकरी यांच्या स्मारक योजनेंतील हा महत्वाचा पहिला टप्पा जरी गांठला गेला तरी यापुढील तितकाच – किंवहुना जास्त महत्वाचा भाग अजून पूर्ण व्हावयाचा आहे. या स्मारक–गृहांत ठेवण्यांत येणारे कै. गडकरी यांचे संपूर्ण वाङ्‌मय, त्यावरील सर्व टीकाग्रंथ, चर्चात्मक लेख, व्याख्यानांची टिपणे वगैरे यांचा संपूर्ण संग्रह, नाटचशास्त्रावरील सर्व ग्रंथ, विशेषत: नाटचशास्त्राच्या अभ्यासकाला व चिकित्सकाला उपयोगी पडेल अशी सर्व ग्रंथसामुग्री वगैरे मिळविण्याचे कार्य आता सुरू झालें आहे. तसेच कै. गडकरी यांचे भव्य तैलचित्र किंवा अर्धपुतळा, किंवा शक्य झाल्यास दोन्हीहि, या स्मारक गृहांत ठेवावयाचे आहेत. त्याचप्रमाणे कै. गडकरी यांचीं हस्तलिखितें, अप्रकाशित वाङ्‌मय, किंवहुना त्यांच्या स्मृतीशीं निगडित असलेल्या सर्व वस्तू एकत्रित करून तो संग्रहहि याठिकाणीं ठेवण्याची योजना आहे.

४ कै. गडकरी यांचे स्मारक हे खरे व जिवंत स्मारक व्हावयाचे असेल व अखिल महाराष्ट्रांतील नाटचभक्तांना वा वाङ्‌मयभक्तांना तें एक स्फूर्तिस्थान वा श्रद्धास्थान व्हावयाचे असेल तर स्मारक योजनेंतील हा दुसरा भाग शक्य तितका लवकर पूर्ण करणे आवश्यक आहे व त्यासाठी विदर्भ साहित्य संघाच्या गडकरी स्मारक–समितीतर्फे आम्ही अखिल महाराष्ट्राला सहकार्याची हांक देत आहोत.

५ हें सहकार्य अनेक रीतीने देता येईल. या कार्यासाठी अपेक्षिलेल्या किमान रु. २५००० च्या निधिसाठी देणग्या जास्तींत जास्त देणे हा एक प्रमुख मार्ग ! वर उल्लेखिलेलें नाटचवाङ्‌मय व दुर्मिळ ग्रंथसामुग्री ज्या ज्या ठिकाणी उपलब्ध असेल त्याची माहिती देऊन, ते देणगीरूपाने, अगर अल्पमूल्य घेऊन मिळवून देण्यासाठी सहकार्य देणे हाही दुसरा मार्ग आहे ! महाराष्ट्रांतील सर्व प्रकाशकांनी, लेखकांनी, नाटककारांनी, टीकाकारांनी, व रसिकांनी, त्याचेजवळ असलेले वाङ्‌मय व नवीन प्रसिद्ध होणाऱ्या ग्रंथांची किमान एक–एक प्रत देणगीरूपाने दिल्यास गडकरी–स्मारक–समिति आभारी होईल. देणगीरूपाने देणे शक्य नसल्यास व तसे कळविल्यास, गडकरी स्मारक समिति तें वाङ्‌मय व ग्रंथ विकत घेण्याची खटपट करील. तसेच कै. गडकरी यांची हस्तलिखितें व इतर प्रकाशित वाङ्‌मय, संग्राहय वस्तु वगैरे देण्याची व मिळवून देण्याची, किमान ज्या ठिकाणीं हें सर्व उपलब्ध असेल त्याची माहिती देण्याची आम्ही जाहीर विनंती करीत आहोत.

६ हा सारा ग्रंथसंग्रह, व वस्तुसंग्रह ठेवण्यासाठी सुंदर व मजबूत आलमाऱ्यांचीहि आवश्यकता आहे. तसेच या ग्रंथालयावर व वस्तुसंग्रहालयावर देखरेख ठेवून त्याची नीट व्यवस्था ठेवणे व कै. गडकरी यांच्या स्मारकाचे व स्मृतिदिनादि नैमित्तिक कार्य चालू ठेवण्यासाठी कायम व्यवस्था करणे जरूर आहे. हें सर्व लोकाश्रयावर व सरकारी आश्रयावर अवलंबून आहे.

७ सर्व हौशी नाट्यसंस्थांनी आणि धंदेवाईक नाटक कंपन्यांनी, किमान एक–एक प्रयोग तरी कै. गडकरी स्मारक समितीला दिला तरी बरीच मदत होण्यासारखी आहे. तरी या कार्याला शक्य त्या मार्गाने व रीतीने सहकार्य देवून हें कार्य पूर्ण करण्याचे कामी गडकरी–स्मारक–समितीला मदत करावी अशी आम्ही जाहीर विनंती करीत आहोत. सर्व व्यवहार खालील पत्त्यावर करावा.

पुरुषोत्तम दिवाकर ढवळे
उपाध्यक्ष, वि. सा. संघ

के. तु. मंगळमूर्ति
अध्यक्ष, मंदिर–निधि–समिति

वा. रा. पुराणिक
अध्यक्ष, ग. स्मा. स.

कु. ताराबाई प्रधान
कार्याध्यक्ष, ग. स्मा. स.

पत्ता :– अॅ. पां. बा. गडकरी
कार्यवाह – गडकरी–स्मारक–समिति
विदर्भ साहित्य संघ,
उत्तर अंबाझरी रस्ता
नागपूर, १

विदर्भ साहित्य संघ

विभाग (अ) मताधिकारी सभासद

१९५५-५६ सालाकरिता
कार्यकारी मंडळाची निवडणूक
सभासदांची यादी १९५४

सभासदांना विशेष सूचना

१. दिनांक १५ ऑक्टोबर १९५४ पर्यंत जे सभासद नोंदलेले आहेत व ज्यांच्याकडे कोणतीहि वर्गणी थकित नाही अशाच सभासदांचा दुरुस्तीच्या घटना नियम नं. १२ (आ) प्रमाणे प्रस्तुत मतदार सभासदांच्या 'अ' आणि 'ब' विभागाच्या सूचींत समावेश करण्यांत आला आहे.

२. निवडणुकीस उमेदवार म्हणून उभे राहण्याचा अधिकार सभासद होऊन ज्यांना वि. सा. संघाच्या नियमाप्रमाणे एक वर्ष झालें आहे अशाच सभासदांस आहे. त्यांचीं नांवें घटना नियम नं. १२ (इ) प्रमाणे प्रस्तुत सूचींतील 'अ' मध्ये दर्शविलीं आहेत.

३. या सूचींतील नांवांबद्दल जर कोणा सभासदाची तक्रार असेल तर घटना नियम नं. १२ (अ) प्रमाणे त्याने दिनांक १५ डिसेंबर १९५४ पर्यंत अध्यक्षांकडे ती केन्द्रीय कार्यालयाच्या पत्त्यावर पाठवावी.

अनवधानतेने कांही नांवांत कमी अधिक फरक पडला असल्यास त्या सभासदांनी तशी सूचना त्वरित देण्याची कृपा करावी, अशी नम्र विनंती आहे.

दि. २५-११-१९५४
केन्द्रीय कार्यालय
उत्तर अंबाझरी रस्ता, नागपूर १.

ना. रा. शेंडे
सरचिटणीस, वि. सा. संघ.

उपकर्ते

	र. क्र.
श्रीमंत दामोदर विनायक देशमुख, धंतोली, नागपूर १	४५
श्रीमंत लक्ष्मण श्रीधर उर्फ बाबूराव देशमुख, महाल, नागपूर २	१
श्रीमंत सौ. सत्यभामाबाई लक्ष्मणराव देशमुख, महाल, नागपूर २	२

आश्रयदाते

	र. क्र.
श्रीमंत गोविंदराव वि. काणे, सेवानिवृत्त तहसिलदार, मोदी लाईन नं. २, सीताबर्डी, नागपूर १	६२
श्रीमंत बापूसाहेब चिटणवीस, न्यू कॉलनी, नागपूर.	१०३
श्रीमंत एम्. जी. चिटणवीस, चिटणीसपुरा, महाल, नागपूर २	१०५
श्रीमंत शंकरराव जोग, प्रोप्रायटर, फुगा फॅक्टरी, अजनी, नागपूर	१०२
श्रीमंत भास्करराव बुटी, सीताबर्डी, नागपूर १	१०४

सहाय्यक सभासद

	र. क्र.
लोकनायक माधव श्रीहरी अणे, नूलकरांचा वाडा, ३४२ सदाशिव पेठ, पुणें २	३

	र. क्र.
श्रीमंत विठ्ठलराव जोग, फुगा फॅक्टरी, अजनी, नागपूर. १	१०६

हितचिंतक सभासद

न्या. मू. के. तु. मंगळमूर्ति, हायकोर्ट जज्ज, धरमपेठ, नागपूर १	४

आजीव सभासद

श्री. विनायक नारायण अळेकर, नवी शुक्रवारी, नागपूर २.	९३
श्री. आ. नी. उधोजी, रहाटे कॉलनी जवळ, जेलरोड, नागपूर १.	११०
सौ. पद्मावतीबाई कळमकर, धरमपेठ, नागपूर १.	५८
सौ. अनसूयाबाई काळे, धंतोली, नागपूर १.	४२
श्री. आनंद पुरुषोत्तम काळे, धंतोली, नागपूर १	५३
श्री. काशिनाथ पुरुषोत्तम काळे, धंतोली, नागपूर १	५५
श्री. पुरुषोत्तम बाळकृष्ण काळे, धंतोली, नागपूर १	५२
श्री. बाळकृष्ण पुरुषोत्तम काळे, धंतोली, नागपूर १	५४
प्रा. श्रीकृष्ण गोपाळ काशीकर, राज्यशास्त्र विभाग, नागपूर विद्यापीठ, नागपूर १	४८
प्रा. डॉ. वि. भि. कोलते, ७१, वेस्ट सेंट्रल रोड, धंतोली, नागपूर १	१३
श्री. दत्तात्रय नारायण कोल्हटकर. १० संगमचाळ, सीताबर्डी नागपूर १	९२
डॉ. गंगाधर त्र्यंबक खरे, रामदासपेठ, नागपूर १	७९
सौ. प्रभावतीबाई खरे, रामदासपेठ, नागपूर १	९९

	र. क्र.
श्री. वि. ल. खरे, बी. कॉम, वसंत-भुवन, धंतोली, नागपूर १	३६
श्री. श्रीकृष्ण विठ्ठल गंधे, संपादक, शारीरिक शिक्षण, लोथे बंगला, धंतोली, नागपूर १	५७
सौ. प्रभावतीबाई जकातदार, सिव्हिल लाईन्स, नागपूर १	११३
डॉ. के. जी. जोशी सोनी लेन, सीताबर्डी, नागपूर १	७४
श्री. पुरुषोत्तम रामचंद्र जोशी, २४५ सोनीलेन, सीताबर्डी, नागपूर १	६७
श्री. य. वि. जोशी, सरचिटणीस, सहकारी संस्था, संगमचाळ, सीताबर्डी, नागपूर १	६०
श्री. के. के. ठाकूर, धंतोली, नागपूर १	८४
श्री. रा. शं. डबीर, वकील, रामदासपेठ, नागपूर १	८३
श्री. पुरुषोत्तम दिवाकर ढवळे, संपादक, ' महाराष्ट्र ' महाल, नागपूर २	२१
श्री. के. व्ही. तांबे, ॲडव्होकेट, रामदासपेठ, नागपूर १	८६
डॉ. वि. ना. यत्ते, धरमपेठ, एक्स्टेन्शन, नागपूर १	७८
श्री. प्रभाकर जगन्नाथ दिवाडकर, गोविंद-सदन, छोटी धंतोली, नागपूर १	६८
श्रीमती द्वारकाबाई देऊस्कर, धंतोली, नागपूर १	८९
श्री. व्ही. एन्. देव, रिटा. डिस्ट्रिक्ट जज्ज, मातृछाया, धंतोली, नागपूर १	८५
प्रा. सौ. कुसुमावतीबाई देशपांडे, धंतोली, नागपूर १	३१
श्री. पुरुषोत्तम यशवंत देशपांडे, हंपयार्डरोड, धंतोली, नागपूर १	८
सौ. विमलाबाई देशपांडे, हंपयार्ड रोड, धंतोली, नागपूर १	१९

	र. क.
श्री. मधुकर लक्ष्मणराव देशमुख, C/o श्रीमंत बाबूराव देशमुख, महाल रोड, नागपूर २	६८
प्रा. डॉ. मा. गो. देशमुख, सरनाईकांचा बंगला धंतोली, नागपूर १	१५
कु. मंदाकिनी लक्ष्मणराव देशमुख, C/o श्रीमंत बाबूराव देशमुख, महाल रोड, नागपूर २	६५
सौ. सगुणाबाई दामोदरराव देशमुख. धंतोली, नागपूर १	४६
श्रीमंत मारोतराव दत्ताजी धनवटे, शिवराज फाईन आर्ट लिथो वर्क्स, नागपूर १.	७५
श्रीमंत सौ. सुमतीबाई मारोतराव धनवटे, शिवराज, फाईन आर्ट लिथो वर्क्स, नागपूर १	७६
श्री. श्री. बा. धावे, अॅडव्होकेट, अयाचित बुवा मंदिराजवळ, नागपूर २	९७
श्री. रामकृष्ण किसनजी धोटे, शक्ति ऑफसेट, वर्धा रोड, नागपूर १	४७
श्री. देवराव अंबादास नाईक, नाईक मॅन्शन, टिळक रोड, नागपूर २	६३
श्री. मॅनेजर, दी नागपूर इलेक्ट्रिक लाईट अँड पॉवर कंपनी, सदर, नागपूर १	६१
श्री. ए. श्री. पटवर्धन, सुभेदार ब्लॉक नं. ५. काँग्रेस नगर, नागपूर १	२२
श्री. ले. क. भा. त्रि. परांजपे, त्र्यंबकेश्वर, नं. ४६७, मॉरिस कॉलेज-मैदानासमोर, छोटी धंतोली, नागपूर १	५६
श्री. द. स. पराडकर, ज्वाला इंडस्ट्रीज, शांतीनगर, इतवारी, नागपूर २	२३
श्री. के. वी. पळसुले, रिटा. डिस्ट्रिक्ट जज्ज, धंतोली, नागपूर १	८८
श्री. गोपाळराव पाठक, C/o पाठक ब्रदर्स, टिळक रोड, महाल, नागपूर २	९४
श्री. त्र्यं. द. देशमुख, पारवेकर, मंगलालय, हंपयार्ड रोड, नागपूर १	२०
डॉ. धोंडो महादेव पालकर, धरमपेठ, नागपूर १	६६
डॉ. शं. दा. पेंडसे, कांग्रेस नगर, धंतोली, नागपूर १	६९
श्री. फुलकुमार पोद्दार, धरमपेठ, नागपूर.	३९
श्री. वी. एल. बांगडे, प्रो. भारत रेडियो हाऊस, महाल, नागपूर २	४१
श्री. ब्रिजलाल नंदलालजी बियाणी, अर्थमंत्री, मध्यप्रदेश, नागपूर १	
श्रीमंत ताराबाई बुटी, संगमेश्वर सीताबर्डी, नागपूर १	३७
श्रीमंत विश्वनाथराव पूर्णचंद्रराव बुटी, जेल रोड, नागपूर १	३२
प्रा. नारायण केशव बेहेरे, हंपयार्ड रस्ता, कांग्रेस नगर, नागपूर १	१२
श्री. छगनलालजी भरूका, धंतोली, नागपूर १	११५
सौ. सरलाबाई भावे C/o डॉ. का. द. भावे, धंतोली, नागपूर १	९५
श्री. गो. आ. भोंसुले, भोंसुले-श्रौति कंपनी, धनवटे चेंबर्स, सीताबर्डी, नागपूर १	३४
श्री. ग. त्र्यं. माडखोलकर " प्रसाद " अभ्यंकर रोड, धंतोली, नागपूर १	१४
श्री. चंद्रशेखर गजानन माडखोलकर, " प्रसाद " अभ्यंकर रोड, धंतोली, नागपूर १	९८
सौ. शांताबाई माणकेश्वर, धंतोली, नागपूर १	७३
म. म. प्रि. वा. वि. मिराशी, विष्णु-सदन, धरमपेठ एक्स्टेंशन, नागपूर १.	१११
श्री. एकनाथ जनार्दन मोहरीर, अॅडव्होकेट, धंतोली, नागपूर १	११२

	र. क्र.
श्री. सदाशिव विश्वनाथराव लिमये, मोर्दी लाईन नं. ३, लिमये वाडा, सीताबर्डी, नागपूर १	११४
श्री. वें. शेषराव वानखेडे, सिव्हिल लाईन्स, नागपूर १	४९
डॉ. वासुदेव गणेश शिंगणापूरकर, वॉकर रोड, महाल, नागपूर २	८०
श्री. गोविंदराव श्रौति, हिंद फिन, धनवटे चेम्बर्स, सीताबर्डी, नागपूर १	९१
सौ. विजया श्रौति स. नं. ७, दक्षिणामूर्ति रोड, महाल, नागपूर २	३५
सौ. प्रभावतीबाई राजारामपंत सगदेव, प्रभा-निवास, जेल रोड, नागपूर १	७१
श्री. रा. पु. सगदेव, प्रभानिवास, जेल रोड, नागपूर १	१८
श्री. भय्यासाहेब सप्तर्षि, धरमपेठ, नागपूर १	१००
सौ. कमलाबाई सरवटे, ३७८, रामदासपेठ, नागपूर १	८७
श्री रामचंद्र मार्तंड हजरनवीस, ॲडव्होकेट, धरमपेठ, नागपूर १	८१
श्री. कविभूषण अण्णासाहेब खापर्डे, खापर्डेवाडा, अमरावती	११
श्री. बाबासाहेब खापर्डे, खापर्डेवाडा, अमरावती	१०
श्री. गो. वा. चिपळूणकर, डिस्ट्रिक्ट जज्ज, अमरावती	९६
श्री. अरुणकुमार देशमुख, जनुनेकर, डॉ. देव यांची चाळ, न्यु. ए. व्ही. स्कूलजवळ अमरावती	१७
श्री. द. ना. ठाकूर मॅनेजिंग एजंट, ठाकूर आणि कं. लि. वडनेरा रोड, अमरावती	६
श्री. श्री. स. पेंढारकर, मुधोळकर पेठ, अमरावती	९

	र. क्र.
प्रा. भ. श्री. पंडित, दामले यांचा वाडा, स्टेशनजवळ, अमरावती	२९
सौ. सरस्वतीबाई महाजनी, ताजनापेठ, अकोला	२५
श्री. अ. भा. माटे, गंगाधर प्लॉटस्, अकोला	२८
श्रीमती गंगूताई भिसे, हेडमिस्ट्रेस, गर्ल्स हायस्कूल, आर्वी, (जि. वर्धा)	१०१
शेठ खुशालचंदजी खजांची, चांदा.	२७
श्री. र. सी. देवईकर, ॲडव्होकेट, चांदा	१२०
श्री. र. गो. ओक, ओक आश्रम, गोलबाजार, जबलपूर.	३८
श्री. कृष्ण विनायक देशपांडे, दिग्रस. जि. यवतमाळ	७
श्रीमती लक्ष्मीबाई धर्माधिकारी, पांढुर्णा, जि. छिंदवाडा	५१
श्री. ज. भि. कोलते, अरुण मुद्रणालय, मलकापूर, जि. बुलढाणा	३३
श्री. विठ्ठलराव रा. गुर्जर, खातीपुरा, भंडारा.	१०८
श्री. ना. तु. गोसावी, वकील, भंडारा.	११७
श्री. ना. रा. जोशी, देवधर वार्ड, भंडारा	१०९
श्री. वि. कृ. मोघे, A. F. O. भंडारा	११६
श्री. नारायणराव राजारामपंत हार्डीकर, वस्तरवारी, भंडारा.	१०७
श्री. ना. ग. डवीर, वकील, गोंदिया, जि. भंडारा	३२
श्री. वि. अ. लिमये, ॲडव्होकेट, गोंदिया, जि. भंडारा	१६

र. क्र.

श्री. सरस्वतीबाई वाईकर, ४०
सिव्हिल लाईन्स, गोंदिया, जि. भंडारा

श्री. ग. गो. व्यवहारे, ४३
रेल्टोली, गोंदिया, जि. भंडारा

श्री. विनायक गोविंद देशपांडे, ७०
इन्कमटॅक्स ऑफिसर, वर्धा

श्री. रामेश्वर बजाज, २४
आंजी रोड, वर्धा

डॉ. शंकर गोविंद जोशी, ९०
आय. डी. हॉस्पीटल, अहमदाबाद

श्री. आ. रा. देशपांडे, ३०
कॉन्स्टीटयूशन हाऊस, न्यू दिल्ली

र. क्र.

श्री. चिं. द्वा. देशमुख, ४४
अर्थमंत्री, गव्हर्मेंट ऑफ इंडिया,
न्यू दिल्ली

श्री. पं. द्वा. देशमुख, ८२
७, क्लाइव्ह रोड, न्यू दिल्ली

श्री. प्र. श्री. कोल्हटकर,
पोस्ट बॉक्स नं. ५४५, पुणें २.

श्री. वसंत बाळकृष्ण देशपांडे, ७७
३९६ अ, सदाशिव पेठ, पुणें २

सौ. ताराबाई यशवंतराव कुळकर्णी, ५९
C/o श्री. वाय. पी. कुळकर्णी,
डी. व्ही. एस. सोलापूर

साधारण सभासद [वा. व. ३ रु. देणारे]

नागपूर जिल्हा

र. क्र.

श्री. गोवर्धनदास अग्रवाल, १०९
सीताबर्डी, नागपूर १

श्री. मदन गोपाल अग्रवाल, M. L. A. ४६६
ॲडव्होकेट, सीताबर्डी, नागपूर १

श्री. श्रीकांत नारायण आगाशे, १२४
असिस्टंट इंजिनिअर, गॅझेटेड ऑफिसर्स
क्वार्टर्स नं १, मेडिकल कॉलेज,
अजनी, नागपूर ३

सौ. कमलाबाई आठवले, ३११
C/o नागपूर स्कूल ऑफ आर्टस्,
हंपयार्ड रोड, नागपूर १

श्री. चिंतामणी रामचंद्र आठवले, १०
गोरक्षणजवळ, धंतोली, नागपूर १

श्री. वसंतराव वासुदेव आठवले, ३१६
नागपूर स्कूल ऑफ आर्टस्,
हंपयार्ड रोड, नागपूर १

श्री. अ. दा. ओक, ६०
साठे यांचा बंगला, पार्क रोड,
धंतोली, नागपूर १

श्री. दिगंबर प्रभाकर ओगले, १४८
नागपूर ग्लास वर्क्स, नागपूर २

र. क्र.

सौ. नलिनीबाई ओगले, १५१
C/o श्री. ना. गो. ओगले,
'महाराष्ट्र' महाल, नागपूर २

श्री. नारायण गोपाळ ओगले, १४९
'महाराष्ट्र' महाल, नागपूर २

